ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जुलै २००८**
**वर्ष २८ वे, अंक ७ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
मुखपृष्ठ : **अरुण जोशी**

**रुची – वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@yahoo.com
granthali01@rediffmail.com
marathividyapeeth@rediffmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

कुमार केतकर यांच्या घरावरील भ्याड हल्ल्याचा निषेध करणारी सभा 'ग्रंथाली'ने योजली होती. साहित्य-संस्कृती क्षेत्रातील मंडळी तिथे जमली असल्याने, स्वाभाविकच अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयाचे विविध पदर तेथे छेडले गेले, पण त्याहून अधिक, या हल्ल्याचे वेगवेगळ्या निषेधसभांमध्ये जे साद-पडसाद उमटले त्यांची दखल घेणारा एक लेख या अंकात प्रसिद्ध केला आहे.

त्याचबरोबर, केतकर यांच्या प्रगल्भतेचे सहज दर्शन घडवेल असे त्यांचे, दहशतवादाच्या निमित्ताने केलेले व श्रोत्यांना विलक्षण भावलेले भाषणदेखील या अंकात आहे. ते आहे एका परिसंवादातले. त्यामध्ये प्रा. अरुणा पेंडसे व नरेंद्र जाधव अन्य वक्ते होते. त्यांची भाषणेही वाचायला मिळतील.

हे सारे राजकारणाचे, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे खेळ झाले. राजकारणातून समाज बदलणे शक्य होते असा ठाम विचारप्रवाह गेल्या शतकभर रूढ होत गेला. अनेक थोरमोठे विचारवंत त्यात अडकत गेले, परंतु मनुष्यमात्रात परिवर्तन व्हायचे तर ते आतून यायला हवे, तशी त्याच्या मनाची घडण झाली पाहिजे. हे समाजाचे काम आहे व ते मुख्यत: सांस्कृतिक आहे. राजकारण हा त्याचा एक भाग आहे. अशी वेगळी मांडणी सुचवणारा सु.गो. तपस्वी यांचा लेख, राम पुनियानी यांच्या पुस्तका-निमित्ताने या अंकात आहे-मोठा आहे पण मुद्दाम वाचावा असा आहे.

त्याशिवाय, जयवंत चुनेकर (भाषाभान) यांचे नियमित सदर चोखंदळ वाचकांचे लक्ष वेधून घेत आहे.

'ग्रंथाली'च्या पुस्तकसंभारात वेगळ्या विषयावरचा ग्रंथराज आला आहे-तो आहे आयुर्वेदीय स्त्रीविज्ञान! पुण्याच्या ख्यातनाम वैद्य शुभदा वेलकणर यांचा. आयुर्वेद सर्व शरीराचा समग्र व सखोल विचार करतो हे खरे, पण त्यातही वेगवेगळ्या शाखांचा विशेष अभ्यास आहे. वेलणकरबाईंनी स्त्रीविज्ञान उलगडून दाखवले आहे. त्याबाबतची माहिती मुद्दाम वाचण्यास आवडेल.

**– संपादक**

## अनुक्रम


- **कुमार केतकर यांच्या घरावरील हल्ला**/दिनकर गांगल/२
- **गरज वंचितांच्या शिक्षणाची**/सु.गो. तपस्वी/९
- **संविधानाची महती**/सुधाकर य. राऊत/१६
- **आयुर्वेदातील स्त्रीरोगचिकित्सा**/वैद्य मधुरा पाटील/१८
- **'दरम्यान' आणि 'कोसो'**/जयवंत चुनेकर/१९
- **दहशतीचे अवतार!**/२२

# युतिकाळात प्रशासन घसरले!

**द.म. सुखथनकर**

युती सरकारच्या काळापासून महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी राजकीय नेत्यांपुढे नतमस्तक झाले आणि कामाचा दर्जा ढासळला असे स्पष्ट उद्‌गार महाराष्ट्राचे निवृत्त मुख्य सचिव द.म. सुखथनकर यांनी 'ग्रंथाली'ने आयोजित केलेल्या 'कृतार्थ' मुलाखत-मालेच्या दुसऱ्या पुष्पात काढले. पत्रकार मृणालिनी नानिवडेकर यांनी ही मुलाखत घेतली.

सुखथनकर म्हणाले, की अंतुले सरकारच्या काळातही नोकरशाही, विशेषत: आयएएस दर्जाचे प्रशासकीय अधिकारी एवढे अवनत झाले नाहीत, कारण त्यावेळी त्यांना समर्थ नेतृत्व लाभले होते. युती सरकारातल्या मंत्र्यांना राज्य कसे चालवावे याचा अनुभव नव्हता, त्यांनी सारी यंत्रणा स्वार्थासाठी वापरली आणि अधिकारीवर्गही त्यांच्यासमोर झुकत गेला. ह्या संदर्भात त्यांनी अंतुलें-समवेतचे काही अनुभव सांगितले व म्हणाले, त्यांनी मला काही वेळा बाजूला टाकले तरी त्यांनी सूडबुद्धी बाळगली नाही; उलट, महापालिका आयुक्तपदाची संधी दिली.

शिक्षण, उद्योग अशा विविध खात्यां-मधील स्वत:च्या कारकिर्दीची माहिती देत असताना त्यांनी सांगितले, की दिल्लीत-देखील मी काम केले, परंतु तेथील हांजी हांजी वृत्तीच्या नोकरशाहीत मन रमले नाही. मराठी मनाचा दिल्लीत कोंडमारा होतो.

यशवंतराव, शंकरराव व शरद पवार हे कर्तबगार मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभले असे सांगून त्यांनी प्रत्येकाची कार्यपद्धत व स्वभाववैशिष्ट्ये वर्णन केली.

सुखथनकर यांचे वय सध्या सत्त्याहत्तर वर्षांचे आहे. त्यांना निवृत्तीनंतर दहा वर्षे शिर्डीच्या साई संस्थानचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या नियुक्तीची पार्श्वभूमी, पहिल्या पाच वर्षांत ते तेथे करू शकलेली कामे आणि नंतरची तणातणीची पाच वर्षे या कार्यकाळाचा त्यांनी आढावा घेतला. ते म्हणाले, की मी नेमणूक झाली तेव्हा साईभक्त नव्हतो, अजूनही रूढार्थाने नाही. परंतु मधल्या काळात जशा घटना घडल्या व त्यांतून निवारलो, त्यामुळे प्रत्येक वेळी वाटे, की साईबाबांचा आशीर्वादाचा हात माझ्या माथ्यावर आहे आणि ही भावना आजही सतत असते.

तरुणपणापासून जोपासलेले शास्त्रीय संगीत ऐकण्याचे वेड, अनुभवलेल्या वेगवेगळ्या मैफली यांचे किस्से त्यांनी सांगितले. पत्नी, मुले, सून आणि बॅडमिंटन-मध्ये राष्ट्रीय पातळीवर चमकणारी नात अशी कौटुंबिक माहिती एका प्रश्नावर उलगडून सांगून त्यांनी मुलाखतीस हृद्य स्पर्श आणला.

'कृतार्थ' मुलाखतमालेतील तिसरे पुष्प, जुलै महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी, १९ तारखेला उलगडले जाणार आहे. विख्यात नाट्यदिग्दर्शक दामू केंकरे यांची त्या दिवशी मुलाखत होणार असल्याचे 'ग्रंथाली'च्या वतीने संध्या जोशी यांनी जाहीर केले. ही मुलाखत इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, गोखले रोड (उ), दादर (प) येथे सायंकाळी ६-३० वाजता होईल. त्यास उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले. मेधा शेंडे यांनी सुखथनकर व नानिवडेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

**(सविस्तर वृत्तांत पुढील अंकी)**

# अभिव्यक्तिस्वातंत्र्य, हल्ले आणि केतकर

कुमार केतकर यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निमित्ताने झुंडशाहीच्या मार्गाने जाऊ इच्छिणाऱ्या पक्ष व गटांचे पुन्हा एकदा स्वरूप पुढे आले. प्रगल्भ लोकशाहीला अभिव्यक्तिस्वातंत्र्य हे प्राणवायूप्रमाणे लागते आणि शासनाचे प्रथम कर्तव्य म्हणजे कायदा व सुव्यवस्था सांभाळून सामान्य लोक व्यवहार व स्वातंत्र्य अबाधित ठेवणे. व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य मानणाऱ्या सर्वांनीच अशा हल्ल्यांचा मनोमन व उघड निषेध केला पाहिजे.

या प्रकरणात हल्ल्या करणाऱ्यांच्या विरुद्ध शासनाकडे दाद मागण्याची, गुन्हे दाखल करायची सोय आहे. वृत्तपत्रे ही मोठी शक्ती असल्याने याची दखल घेतली जातच आहे.

अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आणि मुस्कटदाबीचा मुद्दा या निमित्ताने परत एकदा ऐरणीवर आला हे चांगले झाले. काही निषेध सभांमध्ये आणीबाणीचाही उल्लेख (निषेधात्मक) झाला हेही मी वाचले. परंतु खेदाची गोष्ट अशी की स्वत: कुमार केतकरच आणीबाणीचे घनघोर समर्थक होते व आहेत. अगदी दोन वर्षांपूर्वीच त्यांनी आणीबाणी समर्थनासाठी विस्तृत लेख लिहिल्याने आठवते. वृत्तपत्रांची एक सत्ता असते, त्या भयाने असेल त्यावेळी कोणीच जाहीरपणे याचा निषेध पण केला नाही.

व्यक्तिगत विचारस्वातंत्र्यापेक्षा वृत्त-पत्रीय विचारस्वातंत्र्याच्या कक्षा व खोली जास्त असायला हवी. लेखाद्वारे प्रत्यक्षात केतकरांचे वृत्तपत्रीय अभिव्यक्तिस्वातंत्र्य हे अत्यंत अभिनिवेशी आहे असा अनेकांचा अनुभव आहे. तरीही केतकरांनी साधारणपणे महाराष्ट्रातल्या व्यक्तिस्वातंत्र्याची व अभि-व्यक्तिस्वातंत्र्याची बऱ्यापैकी राखण केली आहे हे खरे आहे.

केतकर हल्ला प्रकरणातले व्यक्ति-विशेष वगळता लोकशाहीतल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, विचारनिष्ठतेचा आणि घराणे-पक्षांचा अभिनिवेश नसण्याचा मुद्दा माध्यमांच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. एखाद्याचे विचार पटले नाहीत तर ते सांगण्याचे त्यांचे स्वातंत्र्य अबाधित असायला हवे. भारतातली माध्यमे याबद्दल अत्यंत सोयीस्कर भूमिका घेतात. माध्यमे व्यक्ति-स्वातंत्र्याला स्वत:च नख लावतात हे आरुषि प्रकरण परत एकदा पुढे आले आहे. भारतातल्या अतिविषम समाज परिस्थितीत आणि दुंभगलेपणात लोकशाहीच्या या मूलभूत मूल्यांची जपणूक करून अहिंसक चळवळी करणेही बऱ्यापैकी अवघड आहे. नक्षलवाद व डावी मंडळी (समाजवादी सोडता) ही लोकशाही केवळ आपदधर्म मानतात. याबद्दल सर्वांनीच सावध असायला हवे. शेवटी हल्लेखोरांचा व हल्ल्याचा मी निषेध करतो. पण केतकरांनी आणीबाणी-बद्दल व चळवळींबद्दलच्या भूमिकांचे प्रस्तुत मुद्याच्या संदर्भात आत्मपरीक्षण करावे असे माझे मत आहे.

**डॉ. शाम अष्टेकर, नाशिक**
shyamashtekar@yahoo.com

# कुमार केतकर यांच्या घरावरील हल्ला

दिनकर गांगल

कुमार केतकर यांच्या घरावरील हल्ला भीषण व भेसूर होता. तो पूर्वनियोजित होता आणि त्याचे स्वरूप सूड काढल्यागत होते. तो टेलिव्हिजनच्या दोन वाहिन्यांवरून सतत दाखवला गेल्याने त्यातील भयानकता भेदक जाणवत गेली. अनेकांच्या मनी आले, की केतकरांनी दार उघडले असते किंवा हल्लेखोर ते फोडण्यात यशस्वी झाले असते तर... केतकरांना नक्की मोठी शारीरिक इजा झाली असती. दूरदर्शनवर पाहणाऱ्यांच्या मनात भय निर्माण व्हावे एवढी दहशत, धाकदपटशा त्या हल्लेखोरांच्या आविर्भावात व कृतीत होते. केतकरांच्या पत्नी शारदा साठे यांनी समयसूचकता दाखवून दार उघडले नाही आणि केतकर यांची धीरोदात्तताही वाखणण्यासारखी, की एवढा मोठा आघात पचवून, घराच्या दारे-खिडक्यांची पडझड तशीच ठेवून, त्याच दुपारी ते ऑफिसला गेले; दुसऱ्या दिवशी प्रकाशनाच्या एका सार्वजनिक कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहिले; आणि जून महिनाअखेर होणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय विद्वत्‌चर्चेच्या संयोजनातील त्यांचा स्वत:चा वाटा त्यांनी हिमतीने पार पाडला!

केवळ संपादक म्हणून नव्हे तर काही ठाम भूमिका असलेला एक प्रगल्भ विद्वान गृहस्थ म्हणून केतकर यांना महाराष्ट्र राज्यात, काही प्रमाणात राष्ट्रात व तेवढ्याच प्रमाणात जागतिक स्तरावरही मान आहे, याबद्दल प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटायला हवा. 'ग्रंथाली'तील आम्हा मित्रमंडळींना तर त्यांचा हा प्रवास जवळून पाहता आलेला आहे. एक धडाडीचा कार्यकर्ता तरुण ते व्युत्पन्न विचारवंत हा त्यांचा विकास प्रेरक व स्फूर्तिदायक आहे. संदर्भप्रचुरता, अचूकतेबद्दलचा आग्रह आणि व्यापक परिप्रेक्ष्यातील विषयमांडणी यांमुळे त्यांचे लेखन व त्याहूनही त्यांची भाषणे मोहक होतात आणि वाचक-श्रोत्यांना हलवून सोडतात. नवनवीन अनुभव व तसेच वाचन, त्याआधारे केलेली निरीक्षणे यांमुळे त्यांच्या बुद्धीची वाढ सतत होत असल्याचे जाणवते. त्यांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातील सिद्धांत थक्क करून सोडणारे असतात. त्यांचे हे विलोभनीय रूप खासगी गप्पांत आणि सल्ला-मसलतींमध्ये विशेष खुलून दिसते.

त्यांची सार्वजनिक प्रतिमा मात्र व्युत्पन्न विद्वान (लेखक व व्याख्याता) आणि काही मतांचा आग्रही पुरस्कर्ता अशी, विशेषत: गेल्या दहा-पंधरा वर्षांत बनत गेली आहे. या काळात, त्यांनी प्रथम 'महाराष्ट्र टाइम्स' व नंतर 'लोकसत्ते'चे संपादकपद भूषवले; ते टीव्हीच्या वेगवेगळ्या वाहिन्यांवर वेगवेगळ्या कार्यक्रमांत दिसत राहिले. ते सार्वजनिक समारंभांतील रोजचे भाषण टाळू शकत नाहीत एवढी निमंत्रणे त्यांना येत असतात.

त्यांची मते, विशेषत: आग्रह पटत नाहीत म्हणून धुसफूस गेली अनेक वर्षे सतत होत आलेली आहे. आम्ही 'ग्रंथाली'तच तिचा अनुभव घेतला, जेव्हा त्यांचे 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक ऐन आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर प्रकाशित केले! केतकरांनी त्या पुस्तकात इंदिरा गांधींच्या धडाडीच्या कर्तृत्वाचे पोवाडे गायले आणि विरोधकांचे राजकारण जवळजवळ बिनतोड युक्तिवादाने हाणून पाडले. केतकरांची लेखनशैली प्रभावी आहे व ती उपमा-उत्प्रेक्षादी सर्व अलंकार सहजरीत्या मिरवू शकते. त्यांची समर्पक शीर्षके, चपखल वाक्प्रयोग वापरण्याची हातोटी सिद्धहस्त लेखकांच्या दर्जाची आहे. त्यांच्या लेखन-शैलीचा मनोरम विलास हा वेगळ्या लेखाचा विषय होईल; पण अखेरीस, ते लेखन 'स्वान्त सुखाय' करत नाहीत; तर लेखन हे हत्यार आहे आणि ते काही कारणासाठी वापरायचे असते अशा शिकवणीत ते तयार झाले आहेत. त्यांनी जवळजवळ सारे लेखन तशा पद्धतीने केले आहे. ही शिकवण मार्क्सवादी विचार-सरणीची आणि लाल निशाण गटातील आहे. त्यांनी औपचारिक पद्धतीने कोणत्याही पक्षाचे अनुयायित्व स्वीकारले नाही. तथापी ते त्या विचारधारेचे पाईक जरूर होते आणि त्यांनी तिच्या प्रसारार्थ लिहिले, 'सत्यचित्र'सारखे पाक्षिक चालवले व अनेक तऱ्हेच्या कृती केल्या. केतकरांचा ग्रंथसंग्रह आणि अभ्यास हा जसा त्यांच्या हुशारीचा विशेष राहिला तसाच त्यांचे लोकांत मिसळणे-त्यांचे निरीक्षण करणे, त्यांच्या योग्य मोहिमांत सहभागी होणे हा त्यांचा कृतिकार्यक्रम राहिला आहे. व्यासंग आणि कार्यकर्त्याच्या कृती या दोन्हींच्या मिश्रणाने केतकरांच्या बुद्धीला असाधारण अशी प्रगल्भता लाभली.

केतकरांची सारी लक्षणे 'ज्वाला-मुखी'मध्ये दिसून येत होती. त्यामधून त्यांची विचारबद्धताही स्पष्ट होत होती. सगळे जग पंडित नेहरूंना अनेक राजकीय पापांचे धनी मानत होते तेव्हा केतकर नेहरू यांच्या धोरणांची योग्यता व त्यातून साधला गेलेला देशाचा विकास (स्थैर्य, आर्थिक विकासाचा नवा ढाचा, देशांतर्गत लोकशाही व निधार्मिकता हे प्रमुख विशेष) सांगत होते. इंदिरा गांधी यांनी तेच राजकारण पुढे नेले; किंबहुना त्यांनी स्वभावानुरूप त्यात आक्रमकता आणली. त्यामुळे नेहरूविरोधक अधिक कडवे इंदिरा गांधीविरोधक बनले आणि तेवढी केतकरांची नेहरू-धोरणांच्या समर्थनाची धार वाढत गेली. (मुदलात

समर्थनाला धार आणणे हाच केतकरी शैलीचा विशेष झाला.)

यथाकाल, देशात नेहरूंबद्दलचे योग्य मापन रुजत गेले. नेहरू नुसते स्वीकारले गेले नाहीत तर अटलबिहारी वाजपेयींना 'भाजपमधले नेहरू' म्हणण्यापर्यंत त्यांचा गौरव होऊ लागला. देशाने इंदिरा गांधींचे आणीबाणी व त्यानंतरचा काळ यांतील वर्तन नंतरच्या निवडणुकांत धुडकावून लावले. त्यातून जनता सरकार आले, परंतु लोकांनी पुन्हा इंदिरा गांधींचा नेत्या म्हणून स्वीकार केला आणि त्यांच्या हाती देशाचा कारभार सोपवला.

खरे तर, तो सगळा इतिहास झाला आहे आणि त्याची वस्तुनिष्ठ मांडणी होणे जरुरीचे आहे. माझ्या मनात, अशा तऱ्हेने इतिहास मांडता येतो का, सत्य नावाची निर्विवाद गोष्ट असते का अशा शंका कायमच असतात. तरीसुद्धा तो काळ पाहिलेला माणूस म्हणून शक्य तितक्या निर्लेप मनाने त्यातील बरेवाईट, योग्यायोग्य हे सांगता येऊ शकते. सर्वसामान्य माणसाच्या पातळीपासून अभ्यासकांपर्यंत सर्वांकडून हे होत असते. किंबहुना इतिहास जनमानसात रुजत जातो तो असाच. ऐतिहासिक घटना व व्यक्ती यांच्या बाबतच्या स्मृती अशाच राहत जातात. समाजात हा जो ठसा असतो, तो जाणण्यासाठी खुले मन लागते. कोणताही मताग्रह चालत नाही.

केतकरांना मुळात मानवी संस्कृतीचा विकास, रेनेसान्सची महती, विज्ञान-तंत्रज्ञानाचा मानवी प्रगतीतील वाटा व त्यास मिळालेली तत्त्वज्ञानाची जोड यांबाबत विलक्षण कुतूहल आहे. या मूळ संकल्पनांमध्ये जिथून छोटीमोठी विचाराची वा कृतीची भर पडते तिथे ते आकृष्ट होतात आणि त्याचे प्रचारक व प्रसारक बनतात. त्यांच्या अशा प्रतिपादनांमध्ये ते विलक्षण प्रगल्भ, परिपक्व जाणवतात. त्यासाठी त्यांचे 'बदलते विश्व' हे पुस्तक वाचावे. केतकरांच्या स्वतंत्र बुद्धि-प्रतिभेची काय झेप आहे ते तेथे जाणवते. त्यांचे असे स्फुट लेखन (भाषणे) व आणखीही झालेले आहे. ते संग्रहित होण्याची गरज आहे. पण राजकारण येते तेव्हा आपण त्या 'केतकरां'ना गमावतो आणि मताग्रही विद्वानाची प्रतिमा उभी राहते. गेल्या दीड-दोन वर्षांत ते अडचणीत येत गेले ते त्यांच्या या प्रतिमेमधून. प्रथम मराठवाड्यातील ब्राह्मण संमेलनात त्यांच्यावर हल्ला झाला. तो त्यांनी तेथे मांडलेल्या क्रांतिकारी विचारांमधून उद्‌भवला. केतकर खरे तेच बोलले याबद्दल बहुतेक साऱ्या विचारी जनांचे एकमत आहे. हिंदू धर्माच्या विकासप्रवाहात अशा उलटसुलट सर्व मतांना दुजोरा देणारी विधाने मिळतात. भारतीय विचारपरंपरेत नि:संदिग्धता अशी क्वचित आढळते; असेही चालते व तसेही चालते असा भोंगळपणा आहे. हा समाज चार-पाच हजार वर्षे एकत्र टिकून राहण्याचे ते एक कारण आहे. त्याने सर्व विचारधारा पचवल्या आहेत आणि तो अशा लवचीक कण्याच्या अवस्थेत जगत राहिला आहे. तेथे केतकरांना तर्कशुद्ध वैज्ञानिक दृष्टी अभिप्रेत आहे. ते त्या अंगाने बेडरपणे बोलत व लिहीत जातात.

परभणीच्या संमेलनातील हल्ला अशा बोलण्याने दुखावलेल्या गटांकडून झाला. ते गट संधीची वाट पाहात असावेत. त्यात योजनाही असावी. अशा मोठ्या संमेलनांत नक्की काय घडले याची एक 'गोष्ट' तयार होते, ती रूढ होऊन जाते. फार कोणी पोलिसदप्तरी काय आहे वगैरे याचा शोध घेण्याच्या भानगडीत पडत नाही आणि मुळात सत्यही संमिश्र असते! तसेच परभणीच्या हल्ल्याबाबत होऊन गेले.

तो हल्ला त्यानंतर, या नवीन हल्ल्याच्या वेळी लोकांना आठवला. तो हल्ला समर्थनीय होता का? नक्कीच नाही. परंतु या नक्कीच मधील 'च'चा जोर मात्र हळुहळू कमी होत गेला, कारण कोणीतरी औचित्याचा मुद्दा काढला. केतकरांनी जो सिद्धांत मांडला तो पुढे आणण्याची जागा तो खुला मंडप आणि ते विशाल संमेलन ही नव्हती. केतकरांनी एकाद्या विद्वत्सभेत तो मुद्दा मांडला असता तर तो स्वीकृत होऊन गेला असता. दुसरे असेही आहे, की ब्राह्मणांच्या परिचित इतिहासात ते गोमांस काय, मांसभक्षण सुद्धा करत असल्याचे माहीत नाही (रामदास फुटाणे म्हणतो की ब्राह्मण मांस खायला लागले आणि मटण महागले! म्हणजे ही तर सध्याची गोष्ट). त्यामुळे ब्राह्मण गोमांस खात होते असे एवढ्या विशाल समुदायासमोर बोलणे किती उचित हा प्रश्न उपस्थित झाला आणि केतकरांचा खरा राग या समाजात आलेल्या सर्व-सामान्यतेला आहे; ज्यांनी विद्वत्परंपरा जपायची तेच आहार-विहाराच्या चंगळीकडे वळले याबद्दल आहे. त्यासाठी तर ते सतत सुरक्षित राहू पाहणाऱ्या मध्यमवर्गीय वृत्तीला झोडपत असतात. त्यांचे ते सारे मुद्दे बरोबर आहेत व त्यांचा प्रतिवाद करता आला नाही म्हणून त्यांच्यावर हल्ला केला गेला. एका तेज बुद्धीच्या माणसावर सर्वसामान्य बुद्धीच्या संघटित होऊ पाहणाऱ्या ब्राह्मणांनी केलेला तो हल्ला होता.

केतकरांनी त्यानंतरही धीर सोडला नाही. त्यांना वाटले, की या समाजातील दुष्प्रवृत्तींना आळा घालण्याचा लढा चालू ठेवला पाहिजे. त्यांचे लिहिणे चालूच राहिले. तेवढ्यात पुण्याच्या भांडारकर संशोधन संस्थेची नासधूस करण्यात आली. या कृत्याने सर्व ज्ञानोत्सुक, सुसंस्कृत व्यक्तींना संतापच आला, पण पुन्हा केतकर कृतीत उतरले. त्यांनी 'इंडियन एक्स्प्रेस'च्या वतीने निधी उभा केला आणि तो समारंभपूर्वक संस्थेस सादर भेट दिला. त्यांची ही कृती विधायक होती. तिला समाजात जो पाठिंबा मिळायला हवा होता तो मिळाला नाही. पुण्याच्या एकाद-दोन संस्थांनी त्यावेळी निषेधाच्या प्रतीकात्मक कृती केल्या, पण नंतर त्या संस्थेतच गटबाजी

सुरू झाली. पैशांच्या अपहारापर्यंतच्या तक्रारी पोलिसांत नोंदल्या गेल्या आहेत.

शिक्षण, संशोधन आणि न्याय ही समाज घडवणारी शेवटची काही क्षेत्रे. तिथेही अनाचार, भ्रष्टाचार, बेधुंद कारभार... अशा सध्याच्या बजबजपुरीत, विचारविसंगतीत आपला (तथाकथित) सुसंस्कृत, बुद्धिवान समाज  एक संस्थाही नीट राखू शकत नाही याची बोच केवढी असायला हवी? पण ती सुशिक्षित समाजात जाणवत नाही. त्याला जागे करण्यासाठी केतकर त्यांची लेखणी परजतात आणि त्यातून स्फुल्लिंगे बाहेर पडतात. पण समाज 'थंड गोळ्या'च्या वर्णनापलीकडे जाऊन पोचला आहे. त्यास कमालीची संवेदनाहीनता आली आहे. आपल्यासारख्या अनेक कृतिवीरांच्या व विचारवीरांच्या प्रयत्नांना जराही दाद मिळू नये याची खंत, हताशता केवढी असू शकेल! आणि पुन्हा जो मनुष्य अंतर्बाह्य आशावादी आहे – गेल्या दोन-अडीच हजार वर्षांच्या मानवी संस्कृतीच्या प्रगतीशील विकासावर ज्याचा खंबीर विश्वास आहे त्याला हे किती बावचळून टाकणारे असणार!

वर्तमानपत्राचे संपादकपद व्रत म्हणून सांभाळणे ही सद्यकाळात अत्यंत अवघड गोष्ट: राजकीय क्षेत्रात अंदाधुंदी – कोणाचा पायपोस कोणाच्यात नाही; सामाजिक क्षेत्रात मूल्यांची वानवा व नीतिविवेक कोणता प्रतिपादायचा याबाबतचा संभ्रम आणि सांस्कृतिक क्षेत्रात बुद्धिप्रतिभेची तोकडी झेप... संपादकाला रोज लिहावेच लागते- सर्व विषयांवर. त्याला सहकारी असतात – ते लेखनकुशल असतात तरीही व्रतस्थ संपादकाला जबाबदारी अधिक वाटते. त्याला रोजच्या घटनांवर नुसती प्रतिक्रिया व्यक्त करायची नसते, तर वाचकाला प्रबुद्ध करायचे असते, विचारांच्या दिशेला पुढे न्यायचे असते, समाज कितीही मूढ असला तरी त्याला कधी सांभाळून घेत-कधी टोचत तर कधी चाबूक मारत शहाणपणाच्या गोष्टी सांगायच्या असतात. माध्यमांकडे सध्या कोणी व्रत म्हणून पाहत नाही, सर्वांच्या लेखी ती करमणूक आहे. अशा वेळी तर व्रतस्थ संपादकाची कामगिरी आणखीच कठीण! केतकर ती निष्ठेने निभावत असतात.

केतकरांचा 'अवतरली शिवशाही' हा अग्रलेख त्याच निष्ठेतून आला. त्या लेखाचा शिवाजीराजांशी काही संबंध नाही. जशी रामराज्य ही पुराणातील एक आदर्श कल्पना तसे शिवशाही हे इतिहासकाळातील एक वास्तव. शिवाजीराजांनी नेटका कारभार करून ते साकार केले; अनेक आदर्श घालून दिले. केतकरांनी आजचे राजकीय पक्ष व कार्यकर्ते कसे मुर्खांच्या नंदनवनात राहत आहेत हे दाखवून देण्यासाठी शिवशाहीचे प्रतीक वापरले. ते समर्पक ठरले, कारण त्यासाठी निमित्त शिवाजीराजांच्या पुतळ्याचेच मिळाले आणि केतकरांच्या शैलीमधून एक अप्रतिम आविष्कार घडून आला.

गेल्या तीस-पस्तीत वर्षांत, 'मराठा'-मधील आचार्य अत्रे यांच्या शैलीदार, वैशिष्ट्यपूर्ण अग्रलेखांनंतर मराठीमध्ये संपादकीय लेखनासाठी चार-पाच व्यक्ती गाजल्या. त्यांत गोविंद तळवलकर, विद्याधर गोखले, कुमार केतकर, अरुण टिकेकर यांची नावे घेता येतील. या सर्वांहून संपादक म्हणून नाव कमावले ते माधव गडकरी यांनी (एका टप्प्यावर, ते महाराष्ट्रात पुलंइतके लोकप्रिय असल्याचे अनुभवले आहे), परंतु ते त्यांच्या व्यक्तिगत स्तंभलेखनाने आणि त्यांनी हाती घेतलेल्या मोहिमांनी. गोखले गाजले ते त्यांच्या शेरोशायरीने. 'सारेगमप'सारख्या मिडिओकर कार्यक्रमात रमणारा मध्यमवर्गीय मराठी माणूस असतो. त्या प्रकारचा व बौद्धिक कुवतीचा वाचक गोखल्यांवर खूष असे. त्यांची भाषणेही तशीच रंगत. अरुण टिकेकर यांची संशोधकबुद्धी उत्तम, तसाच त्यांचा अपार ग्रंथसंग्रह, परंतु त्यांचे एकोणिसाव्या शतकावर प्रेम. ते त्या काळात किती छान असतात हे त्यांच्या ग्रंथसंपदेवरून दिसते. स्थलकाल, क्लॉइस्टर्स पेलसारखी त्यांची पुस्तके मनोरम आहेत, पण वर्तमानपत्री लेखनात ते स्वत:चा फार प्रभाव पाडू शकले नाहीत. तळवलकर यांची शैली रोखठोक. त्यांना अग्रलेखांची शीर्षके समर्पक सुचत. त्यांच्या अग्रलेखांनी महाराष्ट्रावर मोहिनी घातली होती. तेही अभ्यासू व व्यासंगी होते, ते स्वत:ला रॉयवाद्यांच्या परिवारातले समजत, परंतु त्यांना विचारांची बैठक नव्हती. त्यामुळे त्यांचे अग्रलेख प्रतिक्रियारूप असत. वाचकांची पत्रे असतात, त्यांच्या थोडा वरचा दर्जा. त्यांतील पाश्चात्य विचारवंतांचे संदर्भ येथील बुद्धिवादी मंडळींना दीपवून टाकत. केतकरांत या चार-पाच जणांची गुण-वैशिष्ट्ये आहेत व त्या प्रत्येक गुणाची मात्राही अधिक आहे. त्यामुळे केतकरांचे नाव, खरे तर महाराष्ट्रात सर्वत्र दुमदुमले जायला हवे, पण तसे न घडता, त्यांचा जीवच धोक्यात आला.

केतकरांना महाराष्ट्रात चहाते गावो-गावी आहेत. त्यांची व्यक्तिगत ओळख अनेक हजारांच्या घरात असेल. त्यापलीकडे त्यांचा लौकिक गेल्या दहा-पंधरा वर्षांत वाढतच गेला आहे. आता घरावर हल्ला झाला तेव्हा गुगल व याहू या दोन्ही साइट्सवर मिळून चाळीस हजारांच्या वर लोकांनी त्यांना पाठिंबा व्यक्त केला; याखेरीज 'लोकसत्ते'त आलेली पत्रे, आमच्यासारख्या अनेक मित्रांकडे व्यक्त झालेल्या भावना ही संख्या दहा हजारांच्या वर आहे. पण त्यांनी तेवढे किंबहुना त्याहून अधिक शत्रू निर्माण केले आहेत, ते त्यांच्या विचारधारेने-ज्या ईर्षेने ते ती व्यक्त करतात त्या तीव्रतेने व त्यातील आक्रमकतेने. त्यामुळे त्यांच्यावरील हल्ल्याच्या निषेध सभा ज्या ज्या ठिकाणी झाल्या त्या त्या ठिकाणी त्यांच्या मतांमधील विसंगतींचा, त्यांनी चालवलेल्या राजकारणाचा अपरिहार्यपणे उल्लेख झाला. त्यामुळे त्यांच्या लेखणीने दुखावलेले लोक

किती आहेत याचा अंदाज येत गेला.

काय आहे केतकरांचे राजकारण? ते नेहरुवादाचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. काँग्रेसने सहसा हा वाद सोडला नाही म्हणून ते काँग्रेसचेही पुरस्कर्ते आहेत. भारत हा देश जसा सरमिसळ संस्कृतीचा आहे तशीच काँग्रेस पक्षाची संस्कृती राहिली आहे. भारतीय जनतेला नेहरू कुटुंबीय हे त्या संस्कृतीचे प्रतीक (आयकॉन) आहेत असेच वाटतात, म्हणून लोक त्यांच्यावर प्रेम करतात. हे जाणून केतकर नेहरू मंडळींना पाठिंबा देत असतात. तथापी काँग्रेस पक्षाचे विघटन फार झपाट्याने झाले आहे याची केतकरांना जाणीव आहे. देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने भाजपसारख्या जातीय शक्ती किंवा समाजवादी वा डावे यांच्यासारख्या, आधुनिक युगाचे भान नसलेल्या शक्ती सत्तेवर येण्यापेक्षा काँग्रेस सत्तेवर येणे महत्त्वाचे आहे असे त्यांना वाटते, कारण शतकाची परंपरा असलेल्या या पक्षाचा मूळ गाभा निर्दोष आहे आणि तो प्रकट होण्याची, सबळ करण्याची आवश्यकता आहे व तशी शक्यताही आहे असा त्यांचा विश्वास आहे. त्यांनी आपल्या हाती असलेले हत्यार याच कारणी वापरले. त्यासाठी ते काँग्रेसांतर्गत अनेक दोषांकडे दुर्लक्ष करत राहिले; छोट्यामोठ्या तडजोडी करत गेले, पण मुळात ते लढवय्ये असल्याने त्यांच्या विरोधकांवर हल्ले अधिक जोरदार चढवत राहिले.

प्रथम आणीबाणीत जयप्रकाश नारायण. त्यांची 'संपूर्ण क्रांती' भोंगळ आहे, पण ते एक स्वप्न आहे; किंबहुना समाज-वाद्यांचा इतिहास अशी स्वप्ने पाहत जगण्याचा राहिला आहे. त्यांना समाजाचा पाठिंबा कधीच नव्हता, परंतु त्यांनी समाजाची विवेकबुद्धी जागी ठेवण्याचे महत्त्वाचे काम केले.

दुसरे जॉर्ज फर्नांडिस. त्यांची दोन भाषणे आठवतात. एक शिवाजी पार्कवरचे. आणीबाणीच्या काळातील तुरुंगातून सुटून आल्यानंतरचे. त्यांनी बिहारमधील गटार साफ करणाऱ्या एका दुर्बल महिलेची दु:खांतिका वर्णन केली. तिचे आयुष्य सुखी करणे हे आपले कर्तव्य आहे व ते आपल्या पक्षाच्या माध्यमातून साधता येईल हे त्यांनी अतिशय नाट्यपूर्णरीत्या वर्णन करून सांगितले आणि तीस-चाळीस हजारांचा समुदाय गहिवरून गेला होता. यातले काही घडणे शक्य नाही याची जाणीव त्या लोकांना नव्हती की फर्नांडिस खोटे बोलत होते? मला ते सर्व फार सचोटीचे वाटत गेले. त्यांचा हेतू तपासून पाहवा असे वाटले नाही. त्यानंतर 'ग्रंथाली'च्या व्यासपीठावरून 'दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' करताना फर्नांडिस यांनी १९८०च्या सुमारास सांगितले, की २००५ साली गांधी आणि पर्यावरण हे कळीचे मुद्दे असतील. त्यावेळीही त्यांच्या मनाची पारदर्शकता जाणवली होती. प्रत्यक्षात आपण आज त्यांच्या कथनातील सत्यतेचा अनुभव घेत आहोत!

केतकर या दोन्ही व्यक्तींना एकाही ठिकाणी सोडत नाहीत. त्यांचे प्रत्येक कृत्य हे पापकृत्यच मानतात.

तीच गोष्ट शरद पवार यांची. त्यांच्या काँग्रेसमधल्या खेळी सतत चुकत गेल्या आणि ते बाजूला पडत राहिले. त्यांनी त्यातून सावरून स्वत:चे एक स्थान निर्माण केले, ते काँग्रेसशिवाय. हे एका अर्थाने कौतुकाचे. त्यांच्या अनेक टीकाकारांना असे वाटते, की ते यापेक्षा मोठे काही साधू शकले असते. ते त्यांनी केले नाही. केतकरांना काँग्रेस व इंदिरा गांधी-सोनिया गांधी यांच्या (खरे तर, नेहरूंच्या) राजकारणापासून फुटून निघणाऱ्या छोट्यामोठ्याही शक्ती सहन होत नाहीत.

केतकर राजकारणाला एवढे असाधारण महत्त्व का देतात? हा त्यांच्यावर असलेल्या मार्क्सवादाच्या प्रभावाचा आणि शीतयुद्धाच्या काळामध्ये उभ्या राहिलेल्या दोन महाशक्तींच्या संघर्षात त्यांची मते बनत गेल्याचा परिणाम असावा. खरेतर, या गोष्टी १९९० सालानंतर, जागतिकीकरणाने जगाचा कब्जा घेतल्यावर नि:संदर्भ होत गेल्या आहेत. त्यामधून आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्यामधून अखिल मानवतेपुढे जे प्रश्न उभे राहिले आहेत त्यांची जाण, खरेतर केतकरांइतकी फार क्वचित कोणाला असेल.

परंतु केतकर राजकारणात रमतात; ते जेवढे १९४५ ते १९७५ या काळात महत्त्वाचे होते तेवढेच ते आजही आहे असे मानतात व त्या हिरीरीने लेखनात उतरतात. त्या ओघात, इथे तीन नावे नमूद केली. अशा छोट्या-मोठ्या, त्यांच्या दृष्टीने बिनबुडाच्या व्यक्तींचे राजकारण उद्ध्वस्त करून टाकतात. त्यांमधून त्यांच्या एकेकाळच्या विचार-विश्वातले सहकारीही सुटत नाहीत. त्यामुळे ते डाव्यांवरही तुटून पडतात; त्यांची कालबाह्यता ठळठळीतपणे नजरेस आणून देतात. अशा वेळी, लढवय्याचीच उपमा चालू ठेवायची तर केतकर अभिमन्यूसारखे असतात. सर्व बाजूला शत्रूच शत्रू (कारण काँग्रेसचा नाकर्तेपणा त्यांना मनोमन कळून चुकलेला असतोच.) तेव्हा संरक्षण कोणाचे करायचे? त्यामुळे अधिक जोरदार हल्ला!

केतकर सर्वसाधारणपणे व्यक्तिगत निंदानालस्ती करत नाहीत, पण त्यांचाही आवेश कधी वाढतो, सभ्यता कधी ढळते. त्याचे अगदी ताजे उदाहरण उर्मिला पवार यांनी निषेध सभेतील त्यांच्या भाषणात जाणवून दिले. त्यांनी ताज्या अग्रलेखातून 'व्ही.पी. सिंगांचे भूत' यासारखे उल्लेख आलेले आहेत असे नमूद केले.

मुदलात, पत्रकाराचे-समाज-कार्यकर्त्याचे-शिक्षकाचे काम प्रबोधनाचे; त्याच्या त्याच्या समुदायास शहाणपणा शिकवण्याचे. असा या व्यवसायांचा विकास होत गेला. केतकर त्याच परंपरेत वाढत गेले. परंतु त्यांच्यावर गेल्या शतकात विकसित होत

गेलेल्या डाव्या विचारधारेचा प्रभावही प्रखर आहे. ही विचारधारा राजकारणाला समाज-विकासात असाधारण महत्त्व देते; सत्ता हाती घेऊन समाज बदलता येतो असे मानते. परंतु बऱ्याच वेळा मनात असे येते, की मानवी वर्तन नियंत्रित करणारी राजकारण ही एवढी प्रभावी क्रिया आहे का? की गेल्या शतकभर जपला गेलेला हा समज भ्रामक आहे? हे खरे, की घरात, संस्थेत, शहरात, राज्यात व देशात सत्तेचे राजकारण असते. एकेकाळी ही सत्ता विशिष्ट विचारध्येयासाठी हवी असायची, तेवढा उदात्त ध्येय-विचार होता. परंतु सत्ताकारणातून असे बदल साधत नाहीत हे सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर कळून चुकले. आता सत्ता, फारच उदात्त विचार करायचा तर सिव्हिल सोसायटी निर्माण करण्यासाठी हवी असते किंवा दुसऱ्या बाजूला स्वार्थासाठी-करियर म्हणून. (अनेक तरुण सुशिक्षितांचे अमेरिकन सिनेटरप्रमाणे खासदार बनण्याचे स्वप्न असल्याचे कानावर येते.) सैद्धांतिक दृष्ट्या, भाजप, काँग्रेस आणि मार्क्सवादी पक्ष यांच्यामध्ये काही फरक जाणवत नाही; निवडणुका झाल्याच तर 'फ्लुक'ने किंवा खासदारांच्या आकड्यांची जमवाजमव करून जो कोणी सत्तास्थानी येईल तो. तरीसुद्धा अल्पकालीन अथवा दीर्घकालीन दृष्ट्या अमूक एक पक्ष माझ्या पसंतीचा आहे असे सांगणे व तसे आग्रहाने मांडणे कोणाही विचारी माणसाला अवघड वाटेल, पण केतकर ते बेधडकपणे करत राहतात, काळ पूर्णत: बदलला आहे तरी!

माणसाला घडवणारी गोष्ट संस्कृतिकारण असते, राजकारण हा त्याचा एक भाग असू शकतो. मार्क्सवादाचा प्रयोग घडवताना सत्तेकडे समाजबदलाचे ध्येय आले, परंतु 'पॉवर करप्ट्स' हा मानवी मनाचा मूलभूत सिद्धांत विसरला गेला आणि सोव्हिएत रशिया भ्रष्टाचार व नोकरशाही यांमुळे विघटित झाला. कोणाही बुद्धिवंताने अशा राजकारणाची महती किती मानायची? त्यास आपल्या जीवनात व लिखाणात किती महत्त्व द्यायचे?

लोकशाही आणि मार्केटिंग या दोन्ही संकल्पनांमध्ये खूप समानता आहे. त्या दृष्टीने शिवपुतळ्याचा विचार व त्यास विरोध कसे दिसतील? अरबी समुद्रात बेट निर्माण करून त्यावर शिवपुतळा उभा करण्याचा विचार केतकरांना वेडेपणाचा वाटतो. मलाही वाटतो. परवा सभेत लक्ष्मण गायकवाड यांनी तर त्या कल्पनेवर प्रचंड हल्ला चढवला. त्यांचा उपरोध केतकरांच्या अग्रलेखा-इतकाच प्रखर होता. ते म्हणाले, की राज्यात कोठेतरी पाच एकर जागा घ्या आणि तेथे सर्व पुतळे नेऊन उभारा. तो पुतळ्यांचा बगिचा होऊ द्या. लोक तेथे पुतळे पाहायला जातील, त्यांच्यापासून स्फुरण घेतील!

पुढे, त्यांनी सरळ बोलताना 'पुतळ्यांचे राजकारण' असा शब्दप्रयोग केला. म्हणजे ढोबळपणे, पुतळे उभारण्याला केतकरांचा व सुशिक्षितांचा (पेपर वाचणाऱ्यांचा) विरोध आहे. असे लोक पंधरा-वीस टक्के आणि बाकी लोक पर्यायाने पुतळ्याच्या बाजूचे. म्हणजे खरोखर, उद्या पुतळा उभारण्यावर सार्वमत घेतले तर अशी शक्यता आहे, की केतकरांच्या बाजूला पंधरा-वीस टक्के लोक असतील आणि पुतळा उभारावा हे मत सरकारचे व त्यांचे प्रवक्ते यांचे. त्यांच्या बाजूस सत्तर-पंचाहत्तर टक्के लोक असतील. हा लोकशाही कौल झाला. प्रत्यक्षातही, अगदी कमी राजकारण्यांनी केतकरांना पाठिंबा दिला व शिवसंग्रामच्या कृत्याचा उत्स्फूर्त धिक्कार केला.

मार्केटिंगच्या संदर्भात असे म्हणता येईल की केतकरांचे गिऱ्हाईक सुशिक्षितांचे. त्यांना खूष करण्याची 'लाईन' केतकरांनी स्वीकारली. विलासराव-आर.आर.-विनायकराव मेटे यांना लोकशाहीत मते मिळवायची आहेत. त्यांनी मतदार ग्राहकाला पुतळा उभारण्याचे स्वप्न दाखवून खूष केले. त्यांचे पक्ष त्या चढाओढीत पुढे उतरतील.

या मुद्यावर समाजाचे प्रबोधन होणे महत्त्वाचे. केतकरांनी ते केले. त्यांनी त्यांचे पूर्वापारचे राजकारण बाजूला ठेवून पुतळा उभारण्याविरुद्ध भूमिका घेऊन लेखन केले असते तर कदाचित हा हल्ला घडून आला नसता. हा हल्ला ही मुख्यत: त्यांच्या राजकीय भूमिकेची प्रतिक्रिया होती. सध्याच्या राजकारणाला तत्त्वाचा आधार नसल्याने प्रतिक्रिया गुद्यावर आली आणि शरद पवारांसारख्या नेत्यानेही तोल सोडून 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये लेख लिहिला व हल्ल्याला अप्रत्यक्ष पाठिंबा दिला. या हल्ल्याच्या निषेधसभांमध्ये देखील सर्व वक्त्यांनी, शारीरिक हाणामारीच्या विरोधात मत व्यक्त केले असले तरी राजकीय भूमिकेला राजकीय उत्तरच मिळणार असे सूचित केले.

केतकरांवरील हल्ल्यानंतरची शरद पवारांची प्रतिक्रिया अधिक त्रासदायक होती. त्यांनीच सूचकपणे म्हटले आहे, की केतकरांना (संपादकपदाची) कवचकुंडले आहेत तोपर्यंत, परंतु नंतर काय? हे खरेच आहे, की केतकरांना असे मोक्याचे स्थान, पत्रकारितेतून बाहेर पडल्यावर कोणते मिळेल?

पवारांचे सार्वजनिक जीवनातील स्थान स्वयंसिद्ध आहे. ते खासदार-मंत्री झाले नाहीत (तसे त्यांनी जाहीर केले आहे) तरी ते स्थान त्यांच्या पातळीवर उरणार आहे. परंतु ते केतकरांच्या लेखनबाणांनी एवढे घायाळ झाले की त्यांचा तोल सुटला! त्याहून गंमत म्हणजे 'महाराष्ट्र टाइम्स'ने त्यांना आपली पाने वापरू दिली. वृत्तपत्रांतला संकेत असा, की एका वर्तमानपत्रातील भांडणात दुसरे वर्तमानपत्र नाक खुपसत नाही. परंतु सध्या वृत्तपत्रांतील व्यापारी स्पर्धा इतकी टोकाला गेली आहे, की 'महाराष्ट्र टाइम्स'लाही औचित्याचे भान राहिले नाही.

केतकरांचे समाजातील स्थान निव्वळ विद्वान संपादकाचे असते तर हल्ल्यानंतरच्या

प्रतिक्रिया अगदीच वेगळ्या दिसून आल्या असत्या का?

केतकरांच्या घरावरील हल्ल्याच्या निषेधाच्या संदर्भात केतकरांनी आणीबाणीस दिलेल्या पाठिंब्याचा आणि ते त्याचे समर्थन अजूनही करत असल्याबद्दलचा उल्लेख वारंवार झाला. श्याम अष्टेकरांचे पत्र येथे उद्धृत केले आहे. त्यावेळी आविष्कारस्वातंत्र्यावर सरकार पुरस्कृत बंदी होती. वर्तमानपत्रांचा आवाज बंद करण्यात आला होता. त्याविरुद्ध माणूस, साधना, मराठवाडा या नियत-कालिकांनी निषेध नोंदवला आणि त्याची शिक्षा त्या त्या संपादकांना भोगावी लागली.

आणीबाणी हे एका विशिष्ट परिस्थितीस तोंड देण्यासाठी वापरले गेलेले राजकीय हत्यार होते. बिहार व गुजरातमध्ये नवनिर्माण आंदोलन छेडले गेले होते. राजकीय दृष्ट्या विलक्षण उग्र वातावरण झाले होते. विरोधकांची जेथे जेथे संघटित ताकद होती. (उदा. कामगार संघटना) तेथे त्यांनी सरकारची म्हणण्यापेक्षा प्रशासनाची कोंडी आरंभली होती. सर्वसामान्य लोकांच्या हालअपेष्टांना मर्यादा राहिली नव्हती. सरकारी हस्तक्षेपाची गरज होती. लोकशाहीत सत्ताबदल हा मतपेटीतून अपेक्षित असतो. परंतु वातावरण असे निर्माण केले गेले, की सरकार चालवणे मुष्कील होईल. (त्या काळातील तपशिलांची मांडणी व युक्तिवाद उलटसुलट पद्धतीने केले जातात.) तो सारा राजकीय युद्धासमान खेळ होता. त्यात इंदिरा गांधींनी आणीबाणीचे अस्त्र उगारले व देशात व्यवस्था आली. त्यानंतर आणीबाणीतील अतिरेक, तिचा प्रतिकार व आणीबाणीची समाप्ती. तो इतिहास लोकांसमोर घडला, लोकांनीच घडवला. त्या राजकारणात मी शिरू इच्छित नाही.

नमूद एवढेच करायचे आहे, की आणीबाणीचे स्वातंत्र्यावर बंदीसारखे साइड इफेक्ट घडून आले. युद्धसमान परिस्थितीचा तो अटळ परिणाम होता, पण त्यातून समाजजीवनास शिस्त लागण्याची शक्यता निर्माण झाली. सावकारीसारख्या अनिष्ट प्रथांना आळा बसला. (त्या काळातील दलित जीवन जगलेल्या व्यक्तींची आत्मकथने पाहावी), संततिनियमन-वृक्षारोपण यांसारख्या कार्यक्रमांना योग्य महत्त्व लाभले- तो इतिहास वस्तुनिष्ठपणे लिहावा असा आहे. परंतु काँग्रेसनेच आपल्या इतिहासातील त्या महत्त्वाच्या घटनेकडे पाठ फिरवली आहे. राजकीय ध्येयधोरण म्हणून आणीबाणीचा वापर आणि 'शिवसंग्राम'ची झुंडशाही यांमध्ये फरक करायला हवा. युद्धकाळातही प्रेस सेन्सॉरशिप लादली जाते व ती समर्थनीय मानली जाते. ती तात्पुरती *उपाययोजना* असते.

आणीबाणीत देखील माणसाचे मुळात स्वतंत्र असणे आणि त्यावर विशिष्ट काळापुरती विशिष्ट संदर्भात बंधने येणे याबाबत अनौपचारिक चर्चा होतच होती.

जयवंत दळवी हे लेखक समाजवादी प्रवृत्तीचे. त्यांनी त्या काळात त्यांच्या नाटक-सिनेमांमध्ये 'बंडा' नावाचे पात्र निर्माण केले. हा बंडा अमिताभच्या 'शहेनशहा'ची छोटी आवृत्ती होती. त्या संदर्भात दळवींना विचारले गेले तेव्हा त्यांनी उत्तर दिले, की रेशन दुकानांतील भ्रष्टाचार थांबवण्यासाठी शिवसेनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी (बंडाच्या पद्धतीने) कायदा हाती घेतला तरी मला आवडेल, मी त्यांना पाठिंबा देईन! अधिक लोकांना न्याय मिळवण्यासाठी काही मुठभर लोकांवर अन्याय झाला तरी हरकत नाही. (हेच सामाजिक न्यायाचे तत्त्व).

स्वातंत्र्याचा अर्थ काय? त्याबाबत प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत असते. लोकशाही-मध्ये सुद्धा निखळ स्वातंत्र्य नसतेच; बहुसंख्यांनी आणलेली बंधने व नियम सर्वांना पाळावे लागतात. ही बहुसंख्या कशी जमवायची हे राजकारण असते. मला असे वाटते, की राजकारण निकोप राहण्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक संस्था समर्थ असाव्यात व ती जबाबदारी सुशिक्षितांची आहे. ती त्यांनी निभावावी. त्यांनी सध्याच्या बकाल, दिशाहीन राजकीय हालचालींत प्रत्यक्ष बाजू घेऊ नये, कोणाचे सरसकट समर्थन करू नये.

केतकरांच्या घरावरील हल्ला बदल-लेल्या परिस्थितीचे आकलन करून घेण्यास आणि पुढील भूमिका ठरवण्यास अनेक तऱ्हांनी उपयोगी पडणार आहे.





**'ग्रंथाली'कडे उपलब्ध**

**रंगुनी रंगात साऱ्या... –** कमल फाटक

कमल फाटक ह्या नवजीवन संघटना ते लाल निशाण पक्ष ह्या प्रवासातील घडामोडींच्या साक्षीदार आहेत. त्यांनी, संघटनेशी त्यांचा जो वैयक्तिक संबंध आला तो धागा पकडून सांगितलेली ही गोष्ट.

**मूल्य १०० रु. ● शंभर रुपयांत घरपोच.**

## डॉ. राम पुनियानी ह्यांचे 'धर्मवादाचे राजकारण'

# गरज वंचितांच्या शिक्षणाची

### सु. गो. तपस्वी

डॉ. कुमार सप्तर्षी ह्यांच्याबरोबर त्यांच्या व्याख्यानाला गेलो असताना, भाषणाच्या जागी सामाजिक विषयावरील पुस्तकांची विक्री चालू होती. डॉ. राम पुनियानी ह्यांच्या 'धर्मवाद' ह्या छोट्या पुस्तिकेने माझे लक्ष वेधले. पुस्तिका विकत घेऊन वाचल्यावर मी पुस्तिका आवडल्याचे डॉ. पुनियानी ह्यांना फोन करून सांगितले आणि एक दिवस टपालाने त्यांनी पाठवलेलं 'धर्मवादाचे राजकारण - एक चित्रमय निवेदन' हे पुस्तक भेट म्हणून आले. जोडीला, डॉक्टरांचे पत्र होते; 'समीक्षणार्थ पुस्तक पाठवत आहे.'

माझी सारी कारकीर्द औद्योगिक क्षेत्रात अभियंता व व्यवस्थापनतज्ज्ञ म्हणून काम, अशी होती. भारतीय राजकारणाचा व राजकीय इतिहासाच्या माझ्या अभ्यासाला 'शून्य' हेच विशेषण लागू पडेल; समाजकारणाचा व सामाजिक कामाचा माझा प्रत्यक्ष अनुभव, स्वानुभवसुद्धा त्याच विशेषणाला पात्र. सामाजिक संस्था, कार्यकर्ते, वंचित-ग्रामीण समाज वगैरे गोष्टींशी माझा परिचय गेल्या सात-आठ वर्षांतला, निवृत्तीनंतरचा, आणि मराठी लेखनाचा काल पण तो, तेवढाच. अनुषंगाने झालेल्या, विषयाच्या माझ्या अभ्यासाचे सारे सार 'विकासाच्या वाटा - महाराष्ट्राच्या अनुभवातून' आणि 'विकासाची आशा - 'मातृमंदिर'च्या अनुभवातून' ह्या दोन 'ग्रंथाली' प्रकाशित पुस्तकांत सामावते; तेवढेच त्याचे आकारमान.

मी एका मोठ्या उद्योगसमूहात, सर्व स्तरांतील त्यांच्या चार-एकहजार अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा व ते यशस्वीरीत्या कार्यरत करण्याचा एक महत्त्वाचा अनुभव माझ्या कारकिर्दीतील शेवटच्या दोन वर्षांत घेतला. त्यामुळे, प्रौढांचे प्रशिक्षण व प्रबोधन ह्या शास्त्राचा माझा अभ्यास झाला. अहवाललेखन, परीक्षण, समीक्षण, मूल्यांकन आणि शोधकाम व शोधनिबंध, अशा गोष्टी तर माझ्या व्यवसायाचा एक भाग होता. प्रौढ शिक्षणाचा अभ्यास, अहवाललिखाणाचा अर्थपूर्ण व्यावसायिक अनुभव आणि 'टिपण्या'च्या स्वभावामुळे कायम येत असलेली मानवी स्वभावाची आणि वर्तणुकीची जाण, ह्या तीन गोष्टींची जमा झालेली पुंजी गाठीला आहे, म्हणूनच प्रस्तुतच्या पुस्तकाच्या समीक्षणाचे धाडस मी करत आहे. एरवी, मला ह्या विषयावर भाष्य करण्याचा अधिकार नाही. कारण 'धर्मवादाचे राजकारण' ह्या पुस्तकाचा मूळ रोख जरी सामाजिक असला तरी त्यातील बराच भाग राजकीय स्वरूपाचा आहे. अर्थात, ते विषयाला अनुसरूनच आहे.

> **शिक्षणातून वंचितांचा विकास साधला जाईल. शिक्षणामुळे जशी वैचारिक क्षमता वाढते, तद्वत उदर-निर्वाहाच्या, उपजिविकेच्या साधनांसाठी विविध पर्याय उपलब्ध होतात; त्यातून जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारते. 'राजकारण्यांकडून चिथावले जाऊ नका' ह्या गोष्टीच्या आकलनाला जशी वैचारिक क्षमता गरजेची आहे, तद्वत, त्यासाठी पोट पण भरलेले असावे लागते.**

कोणतेही समीक्षण सापेक्ष असते. मुख्य कारण हे, की लेखक व समीक्षक ह्यांचे दृष्टिकोन भिन्न असू शकतात. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे, लेखकाचा लिखाणाचा उद्देश व त्याला अपेक्षित असलेला वाचकवर्ग. ह्या गोष्टी, लेखक पुस्तकात नेहमीच स्पष्टपणे व्यक्त करेल, असे नाही.

उद्देशाचा अंदाज बांधण्याकरता प्रस्तुतच्या पुस्तकाच्या प्रास्ताविकातील काही मजकूर उद्धृत करतो; कंसातील शब्द माझे.

१. 'ज्या (धार्मिक) मुद्यांवर हे राजकारण पेटते त्या मुद्यांशी सर्वसाधारण समाजाला काही देणेघेणे नसते. तरीपण त्याद्वारेच (समाजाच्या) भावना भडकावल्या जातात, ज्यामागे खरे सामाजिक वास्तव साळसुदपणे झाकले जाते. असा उन्माद मुख्यत: उपेक्षित समाजविभागाच्या विरोधात फैलावला जात असतो. हेच लोक दंगल, हिंसाचार घडवतात आणि दंगलीचे बळीही ठरतात. हा सर्वनाश घडवणारे जमातवादी (राजकारणी) मात्र नामानिराळे राहतात'.

२. 'देशातील वातावरण तर गढूळ झालेच आहे. तेव्हा सच्चाई काय आहे ते उलगडून पाहण्याची हीच वेळ आहे. त्याशिवाय धर्मवादाचे राजकारण काय असते ते कळणार नाही. या पुस्तकात त्या दृष्टीने एक डोळस प्रयत्न केला आहे.'

भारतातील धर्मवादासंबंधात सत्य शोधून प्रबोधनाकरता त्याचे सादरीकरण करण्याचा उद्देश तर स्पष्टपणे व्यक्त झाला होता, पण वाचकाचे चित्र, स्वरूप काय, हा प्रश्न उरतोच. वंचित, उपेक्षित ह्यांनाच वाचक धरून चाललो असतो, पण कोण वंचित सवड काढून वाचणार आणि किती वंचितांना वाचता येते? उपेक्षित म्हणजे कोण? फक्त मुस्लिम बांधव का? ह्या

प्रश्नांची उत्तरे शोधत वाचायला लागलो, वाचत गेलो.

संभाव्य वाचकांचा रस व दृष्टिकोन आणि त्या दृष्टिकोनातून त्यांची संभाव्य प्रतिक्रिया लक्षात घेऊन (एम्पथेटिक ॲप्रोचने) लिखाण होणे महत्त्वाचे असते. त्याकरता, लेखकाने गृहीत धरलेला संभाव्य वाचक कोण, ह्याचा अंदाज समीक्षकाला असला पाहिजे. त्या प्रश्नाचा उलगडा मला 'धर्मनिरपेक्ष – चळवळीसमोरची आव्हाने' ह्या, पुस्तकातील दहाव्या प्रकरणातून पृष्ठ एकशेचौदावर केलेल्या आवाहनातून झाला. त्या परिच्छेदातील शेवटची दोन वाक्ये, त्याकरता, मी उद्धृत करतो.

'पण परस्परपूरकता व संवादसंपर्क साधण्याच्या अभावामुळे चळवळी, सक्षम असूनही प्रभावहीन आहेत. आपापले नियत कार्यक्रम चालू ठेवूनदेखील या चळवळी एकत्र येऊन महासंघटन बांधू शकतात आणि आपल्या कार्याला एक व्यापक आशय देऊ शकतात'.

ह्या विधानावरून पुस्तकासाठी लेखकाने गृहीत धरलेला खरा वाचकवर्ग जो आहे तो सामाजिक चळवळींचे नेते, असे अनुमान मी करतो.

स्पष्ट केलेल्या माझ्या मर्यादा, पुस्तकाचा उद्देश व अपेक्षित वाचकवर्गा-बद्दल मी केलेले अनुमान, ह्यांनुसार प्रस्तुतच्या पुस्तकाच्या समीक्षणार्थ मी पुढील निष्कर्ष सादर करतो.

१. चिकाटीने संशोधन करून संकलित केलेली माहिती यथोचित सादर केली आहे.

२. जे जे विचार मांडले आहेत त्यासाठी सयुक्तिक आधार देण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला आहे.

३. प्रकरणांची आखणी, मांडणी व अनुक्रम तर्कशुद्ध आहे.

४. चित्रे, व्यंगचित्रे व छायाचित्रे समर्पक आहेत.

५. मांडणी करताना मूळ मुद्दा म्हणून दुसऱ्या बाजूचा प्रचलित विचार मांडून, नंतरच्या स्पष्टीकरणातून तो खोडून काढून अप्रत्यक्षपणे सत्य उजेडात आणण्याची शैली परिणामकारक आहे; प्रौढ वाचक व उद्देश ह्यांना जमेस धरून ते योग्य आहे.

६.'धर्मनिरपेक्षता – चळवळी-समोरील आव्हाने' हे प्रकरण चिंतनीय आहे. त्या, दहाव्या प्रकरणापर्यंत येण्यापूर्वी योग्य प्रबोधन साधले गेल्यामुळे, वाचकाची पार्श्वभूमी तयार झाल्यामुळे, केलेल्या आवाहनाचा सकारात्मक परिणाम वाचकावर होण्याची शक्यता वाढते.

७. 'हे तुम्हाला माहीत आहे का?', ह्या शीर्षकाच्या व अशा प्रकारच्या इतर चौकटींतून टाकलेला मजकूर पुस्तकभर विखुरलेला आहे. त्यामुळे, पदोपदी, वाचकाला मूळ मुद्याशी खिळवून ठेवणे साध्य झाले आहे. विविध मजकूर निव्वळ उद्बोधकच आहे, असं नाही, तर तो वाचकांच्या विचारांना चालना देऊन मतपरिवर्तन साधण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे, गरजेचा आहे आणि म्हणून निश्चित उपयुक्त आहे.

हेतू साधण्याच्या दृष्टिकोनातून मला थोडी खटकलेली बाब पुढील विवेचनातून स्पष्ट होईल.

भाषांतरकार देशपांडे हे प्रस्तुतच्या मराठी आवृत्तीत 'भूमिका' ह्या शीर्षकाखाली केलेल्या त्यांच्या निवेदनात म्हणतात, 'या पुस्तकात प्रामुख्याने हिंदुत्त्ववादी राजकारणाचा परामर्श घेण्यात आला आहे.' समर्थनार्थ त्यानंतरची वाक्ये आहेत, 'कारण, मूलतत्त्ववादी विचार-सरणीशी निगडित राजकारण आणि सामाजिक तणाव तेवत ठेवण्याच्या व्यवहारनीतीमुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही धर्मनिरपेक्ष लोकशाही मूल्ये धोक्यात येत असतात. सर्वांगीण सामाजिक विकास आणि अशा विकासप्रक्रियेतील उपेक्षित समाजविभागांचा सहभाग कुंठित होऊ शकतो.'

जोडीला, पुस्तकाचे शीर्षक आहे, 'धर्मवादाचे राजकारण'.

ह्या दोन्ही गोष्टींचा एकत्र विचार करता असा अर्थ निघू शकतो, की भारतात, निदान प्रामुख्याने, फक्त हिंदुत्ववादी पक्ष धर्माचे राजकारण करतात. हे बरोबर आहे का चूक ते सांगण्याचा हक्क मला नाही, हे मी सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे.

वाचायला सुरुवात केल्यावर 'निघालेल्या' ह्या अर्थाचा परिणाम वाचकाच्या मनावर होईल, हे लेखक जाणतो व त्याला ते तसे हवे आहे, कारण ते सत्य आहे, असे म्हणून ती गोष्ट मी नजरेआड केली असती. परंतु भाषांतर-काराच्या 'भूमिका' निवेदनानंतर लागलीच 'अंतरंग' ह्या शीर्षकाखाली पुस्तकाची अनुक्रमणिका दिली आहे व अंतरंगाच्या पाठीमागच्या पानावर सादर केलेल्या चौकटीत लेखकाचे मौलिक विचार आले आहेत. त्या चौकटीतील अंतिम वाक्य आहे,

'धर्मवादाचे राजकारण करू पाहणारे हिंदुत्ववादी आहेत, तसेच मुस्लिम आणि ख्रिश्चनदेखील आहेत.'

भूमिकेत नमूद केलेला, 'निघू शकणारा' अर्थ लेखकाच्या विधानाशी विसंगत आहे.

'भूमिके'त केलेल्या एखाद-दुसऱ्या विधानांखेरीज मुस्लिम धर्मवादाच्या राजकारणाची चर्चा पुस्तकात फक्त एका छोट्या प्रकरणात आली आहे व त्या प्रकरणातसुद्धा जास्त चर्चा भारतीय राजकारणापेक्षा आंतरराष्ट्रीय मुस्लिम धर्मवादाची आहे. 'भूमिके'त जी एक-दोन विधाने आहेत, त्यांतील शब्दयोजना सुद्धा लक्षात घेऊया.

भूमिकेतील ती विधाने अशी,

१. '१९८६ साली गाजलेले शहाबानो पोटगी प्रकरण इथल्या झोटिंग-शाहीला निमित्त झाले. आणि.......'

२. '....... अशा (सनातन) मुस्लिमांचे अन्य इस्लामी राष्ट्रांतील मुस्लिमांशी 'संबंध' असल्याचा सातत्याने

प्रचार झाल्यामुळे हे लोक भारतीय नसल्याच्या कागांव्याला खतपाणीच मिळाले आहे.'

पहिल्या वाक्यात 'निमित्त' हा शब्द व दुसऱ्या विधानातील 'कांगावा' हा शब्द, आणि भाषांतरकाराने म्हटल्याप्रमाणे, पूर्ण पुस्तकात प्रामुख्याने हिंदुत्ववादी राज-कारणाचा परामर्श घेतला गेल्यामुळे, लिखाण मुस्लिमांची बाजू घेऊन केल्याचा आभास निर्माण होतो, मूळ मुद्दा बाजूला राहतो.

सुरुवातीलाच वाचनात आलेल्या अशा आभासामुळे वाचक पूर्वग्रहदूषित होण्याचा संभव वाढतो, लिखाणाच्या नि:पक्षपातीपणाला बाधा येऊ शकते, लेखकाची विश्वासार्हता धोक्यात येते; पुस्तकाच्या उद्देशाला ते मारक ठरू शकते.

कोणताही संदेश ग्राह्य ठरण्याकरता वापरलेले माध्यम एकांगी नसावे; भासता सुद्धा कामा नये. तसे झाले, तर 'पालथ्या घड्यावर पाणी', असे तर होतेच, त्याशिवाय वाचकांचे, ज्यांचे प्रबोधन करायचे त्यांचे पूर्वदूषित ग्रह दूर होण्याऐवजी ते अधिक घट्ट होण्याची संभावना असते.

प्रबोधनकाराने चुकूनसुद्धा, फक्त एकदा जरी एकतर्फी विधान केले, एखाद्या पक्षाची बाजू घेतली, की तो आपला नि:पक्षपातीपणा हरवून बसतो; खरे सांगूनसुद्धा पक्षपात केल्याचा मुलामा देण्यास इतरांना वाव मिळतो. प्रबोधनकाराने भासातूनसुद्धा अशी संधी दिली तर विभाजन साधण्यासाठी टपलेले राजकारणी त्या संधीचा हमखास फायदा घेतात.

आशय व हेतू ह्यांच्या पलीकडे जाऊन समीक्षणातून इतरांना, सामाजिक कार्यकर्त्यांना व अशा तऱ्हेचे प्रबोधनात्मक लिखाण करणाऱ्यांना काही फायदा होत असेल, तर तशा बऱ्यावाईट गोष्टी, प्रस्तुतचे लिखाण ही एक 'केस-स्टडी' आहे, असे मानून, नजरेस आणून देणे, हे समीक्षकाचे कर्तव्य ठरते. त्यानुसार, काही निरीक्षणे, विचार मांडतो.

१. प्रबोधनाचे सार ठरवताना सर्वप्रथम उद्देश व त्यानंतर प्रबोधन कोणाचे, ह्या गोष्टींबद्दल प्रबोधनकाराच्या मनात एक तर कोणताही गोंधळ नसावा व ठरल्यानंतर ते स्पष्टपणे शब्दांत उतरवावे. त्यामुळे प्रबोधनाचा आराखडा तयार करताना, व प्रत्यक्ष प्रबोधन करताना त्या गोष्टी कायम डोळ्यांसमोर राहतात.

२. कोणताही संदेश वा प्रबोधन ग्राह्य ठरण्याकरता आशय ठरवताना, सादरीकरण साधताना आणि उदाहरणे देताना, ते एकांगी होत नाही ह्याकडे लक्ष द्यावे.

प्रस्तुतच्या पुस्तकात पहिला मुद्दा साधल्याचा व दुसऱ्या मुद्याबाबत काही संदेह निर्माण झाल्याचा उल्लेख आधी आलाच आहे.

**भारतात समर्पक समाज-कारण साधण्यासाठी वंचित समाजाला शिक्षणाकडे वळवले पाहिजे. प्रबोधनातून वंचित प्रौढांना स्वत:च्या नाही तरी निदान त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचे मोल उमजले पाहिजे.**

३. प्रबोधनकाराने प्रबोधनातून चिकित्सा करून निष्कर्ष साधण्यापेक्षा ज्यांचं प्रबोधन साधायचे त्या व्यक्तींना, वाचकांना मुद्यावर विचार करण्यापुरती माहिती देऊन चिकित्सा व निर्णय, त्यांचा त्यांच्यावर सोपवावा. निष्कर्ष त्यांचे त्यांनी काढले तर ते व्यक्तींना वाचकांना आपले आपल्याला ग्राह्य वाटतात व त्यांच्या वृत्तीबदलाचा उद्देश साध्य होण्याची शक्यता वाढते.

प्रस्तुतच्या पुस्तकात वापरलेल्या शैलीतून लेखकाने ही गोष्ट साधली आहे.

हे सुद्धा ध्यानात घेतले पाहिजे, की चिकित्सेला एकदा सुरुवात झाली की गाडलेल्या गोष्टी उफाळून वर येतात. त्यामुळे विसरलेल्या कडू गोष्टींचे स्मरण करून दिले जाते; दु:खाला उजाळा मिळतो, सूडबुद्धी जागी होते, समूहात तट पडतात.

खरे तर, राजकीय-सामाजिक परिस्थितीत दोन्ही बाजू, कधी ही तर कधी ती, अपराधी असतात. म्हणून प्रत्यक्ष चिकित्सा, किमान सार्वजनिक चिकित्सा, टाळावी.

चूक सिद्ध करण्याची तशी गरजच नसते; करणाऱ्याला ते माहीत असते. फक्त, दोन्ही पक्ष सूडबुद्धीतून, क्रमाक्रमाने, चुका करत असतात, सारेच त्या दुष्टचक्रात अडकलेले असतात.

आतापर्यंतचे विवेचन जर ग्राह्य मानले तर प्रस्तुतच्या पुस्तकातील काही मजकूर, जो सकारात्मक मानता येणार नाही, तो टाळणे प्रबोधनाच्या उद्देशाच्या संदर्भात योग्य ठरले असते. उद्देश साधण्याच्या दृष्टिकोनातून नकारात्मक प्रबोधन हानिकारक असते; एकांगी भासल्यावर, जास्तच हानिकारक!

४. प्रबोधनाचा आराखडा तयार करताना ज्यांचे प्रबोधन साधायचे त्यांची वैचारिक क्षमता, खोलात शिरू शकण्याचा आवाका, निर्णय घेण्याची समर्थता लक्षात घ्यावी लागते.

मुद्दा स्पष्ट करण्यासाठी एक उदाहरण देतो. कोर्टात खटल्याची सुनावणी होत असताना वादीच्या वकिलाने मांडलेल्या युक्तीवादाला प्रेक्षकमंडळी दाद देतात. त्यानंतर, प्रतिवादी पक्षाच्या वकिलाने केलेले बचावाचे भाषणसुद्धा टाळ्या घेऊन जाते. परंतु, निर्णय घेण्याची, योग्य निकाल देण्याची क्षमता उपस्थित प्रेक्षकांत नसते;

ती कुवत फक्त न्यायाधीशाकडे असते. ह्या उदाहरणात हे लक्षात घेतले पाहिजे, की दोन्हीकडील वकिलांनी प्रबोधन साधले पाहिजे ते न्यायाधीशाचे, प्रेक्षकांचे नव्हे.

प्रस्तुतच्या पुस्तकाचा वाचकवर्ग हा वंचितांचे नेते मानला तर लिखाण समर्पक ठरेल. तो तसा आहे, हे आधी नमूद केलेच आहे. परंतु, समजा हेच लिखाण

वंचितवर्गाला वाचक मानून केले गेले असते, तर ते कुचकामी ठरल असते.

सामान्य प्रौढांच्या सार्वजनिक प्रबोधनात 'काय बरोबर व कोण बरोबर वा चूक' अशा गोष्टींची चर्चा, आधी विशद केलेल्या कारणाकरता टाळली पाहिजे. समर्पक प्रबोधनासाठी असे प्रश्न विचारले पाहिजेत की जेणेकरून वाचणाऱ्याचे, ऐकणाऱ्याचे विचारचक्र सुरू होईल.

हेही लक्षात घ्या, की वाचकवर्ग बदलल्यावर लिखाणाचा उद्देशसुद्धा थोडा – फार बदलू शकतो. मूळ उद्देश होता 'नेत्यांना एकत्र आणण्यासाठी प्रबोधन'. त्याऐवजी, वंचित, उपेक्षित हे वाचक मानले तर प्रबोधनाचा उद्देश असेल, असावा, 'वंचितांनी राजकारण्यांच्या चिथावण्याला बळी पडू नये.' बदललेला उद्देश व वाचकवर्ग ह्यांनुसार प्रबोधन म्हणजे पुढील प्रकारचे प्रश्न विचारून वृत्तीबदल साधण्याचा प्रयत्न करणे.

४.१ मुळचा धार्मिक मुद्दा, जो मुद्दा घेऊन तुम्हाला दंगल करण्यासाठी भडकावले गेले, त्या गोष्टीचा तुमच्याशी, तुमच्या रोजच्या जीवनाशी संबंध कोणता व किती?

४.२ दंगलीत ज्यांच्यावर तुम्ही हल्ला केला, त्या लोकांचा मूळ मुद्याशी प्रत्यक्ष संबंध कोणता व किती? त्या मुद्यासाठी तुम्ही त्यांना जबाबदार मानता का?

४.३ चिथावणीपूर्वी, तो मुद्दा तुम्हाला कधी 'बोचणाऱ्या' स्वरूपात जाणवला होता का?

४.४ दंगलीमुळे कोणाकोणाचे नुकसान झाले?

४.५ दंगल झाली, ओसरली, आता तो मुद्दा संपला का?

४.६ ज्यांनी त्या मुद्याच्या आधारे तुम्हाला चिथावून दंगलीसाठी प्रवृत्त केले, त्या व्यक्तींना दंगलीमुळे झळ पोचली का?

(खरे तर, सामान्य प्रौढांसाठी अशा विषयांवर लिखीत प्रबोधन विशेष उपयोगाचे ठरत नाही. म्हणून, अशा प्रश्नांच्या उत्तरांसाठी गटागटांतून चर्चा साधावी. गट तयार करताना प्रत्येक गटात दोन्ही बाजूंच्या लोकांचा समावेश असावा. चर्चा त्यांची त्यांनी करावी. प्रबोधनकाराने फक्त समर्पक प्रश्न विचारावेत. उदाहरणार्थ, 'यापुढेही असेच, एकमेकांचा नुकसान करत राहायची तुमची इच्छा आहे का? झाले-गेले, पुढचा-मागचा हिशोब फिटला, आता तरी शहाणे होणार का?' वगैरे. अशा तऱ्हेने, प्रबोधनकाराने लोकांच्या तडजोडीसाठी गटवार चर्चेतून अप्रत्यक्ष सहभाग साधावा.)

इथे एक गोष्ट लक्षात घ्यायची आहे आणि ती म्हणजे मतपरिवर्तन साधायचे असते ते, जे वाचक-श्रोते तुमच्या मताशी सहमत नसतात त्यांचं; तुमच्या मताशी जे अनुकूल आहेत, त्यांना प्रबोधनाची गरजच नसते. चिकित्सात्मक प्रबोधनातून ठामपणे काही सिद्ध करण्याचा प्रयत्न केला तर जे सहमत नाहीत त्यांना ते 'तुमचे' मत, 'तुमचा निष्कर्ष' वाटतो. त्यानंतर, वाचणे वा ऐकणे ते थांबवतात; प्रबोधनकारांत व वाचकांत, श्रोत्यांत एक भिंत तयार होते. फार तर, काही जण साशंक होतात, त्यांच्या मनाची चलबिचल होते; शंकानिरसन करण्याकरता ते त्यांच्या नेतृत्वाकडे जातात, तेथील प्रवचनानंतर परत 'येरे माझ्या मागल्या' सुरू होते.

दारू सोडवण्याच्या प्रयत्नांसारखेच चिकित्सात्मक व उपदेशात्मक प्रबोधन निरुपयोगी ठरते. दारू पिण्यातून होणाऱ्या नुकसानीचा, होणाऱ्या दुष्परिणामाचा सल्ला घेऊन घरी परतणाऱ्या दारुड्याला घराच्या रस्त्यावरील भुलावणारा गुत्ता जे साधतो, तेच होते; दारू सोडण्याचा सल्ला दारूच्या पेल्यात बुडवला जातो! दारू, ज्याचे त्याने ठरवले तरच सुटण्याची शक्यता असते.

प्रबोधनाचा उद्देश लोकांना चर्चेसाठी उद्युक्त करण्याचा असावा. संबंधितांनी आपापसात चर्चा केली तर सामोपचाराने प्रश्न सुटण्याची, मते बदलण्याची, एकमेकांचे दूषित ग्रह दूर होण्याची वा गाडले जाण्याची शक्यता निर्माण होते. इतिहासात काय झाले ह्यावरून भविष्य ठरवण्याऐवजी, प्रबोधनातून विचारपूर्वक, डोके शाबूत ठेवून सुखाच्या भविष्याला लोकांनी जवळ केले पाहिजे.

५. कोणतेही प्रबोधन जसे उपदेशात्मक नसावे तसेच त्यातून, शक्यतो, कोणावरही टीकास्त्र सोडू नये, कोणावरही आरोप करून त्याला आरोपीच्या कठड्यात उभे करण्याचा प्रयत्न करू नये. उदाहरणे द्यावीत, पण ती सकारात्मक असावीत.

प्रस्तुतच्या विषयासंदर्भात बोलायचे झालं तर, असे, आपापसातले तंटे सामोपचाराने कोणी, कुठे व कसे मिटवले, अशा घटनांची उदाहरणे समर्पक ठरतील. उदाहरणार्थ, 'भिवंडी फॉर्मुल्या'तून 'मोहल्ला समित्या' कशा स्थापन केल्या गेल्या, त्या समित्यांच्या चर्चेतून कसे फायदे झाले, संबंधित व्यक्तींची आत्मकथने, विविध मोहल्ला समित्यांमधील प्रत्यक्ष चर्चेची माहिती, वगैरे गोष्टी जर अशा प्रबोधनात समाविष्ट केल्या गेल्या तर योग्य परिणाम साधण्यास मदत होऊ शकेल.

६. सारे वंचित इथूनतिथून सारखे; वंचितच! एखादा भुकेला भिकारी, फाटक्या कपड्यांतील मोलकरीण, हॉटेलात काम करणारा अल्पवयीन अर्धपोटी पोऱ्या, हिंदू आहे का ख्रिश्चन, बिहारी आहे का तामिळी, त्या व्यक्तीची मातृभाषा मराठी आहे का हिंदी, ह्याने काही फरक पडत नाही. फरक असतो तो नेतृत्वात, नेतृत्वाच्या मनात, मग ते नेतृत्व समाजकारणी असो वा राजकारणी; समाजकारणी तात्त्विक बाबींत रमतात, राजकारणी विभाजन साधतात.

विभाजन राजकारण्यांच्या कामास येते हे जागतिक सत्य आहे आणि त्या सत्यात कधीही, कोणत्याही बदलाची अपेक्षा करणे हा भाबडेपणा आहे, ह्या टोकाच्या मताला मी येऊन पोचलो आहे.

आपल्या देशात धर्मकारणातून वंचितांचे विभाजन साधणे ही एक सहज-साध्य राजनीती बनली आहे. सारेच

राजकारणी, मग ते कोणत्याही रंगाचे असोत, ह्या सोप्या मार्गाचा अवलंब करतात; कोणी उघडपणे, कोणी बुरख्याआड, कोणी चलाखीने साळसूद राहून, तर कोणी तुमच्या-माझ्या मूल्यांची, मतांची पर्वा न करता, सर्रासपणे. गर्दीची मानसिकता (मॉब सायकॉलॉजी) व प्रोपागंडा (परत परत तेच ते सांगणे) ही मानसशास्त्रीय साधने वापरण्यात राजकारणी कसबी असतात, त्यांच्याशी कोणाची तुलना होऊ शकणार नाही.

प्रस्तुतच्या पुस्तकातील प्रबोधनाचा उद्देश सामाजिक नेतृत्वाला फक्त माहिती देण्याचा असायला पाहिजे आणि आहे. राजकारण्यांनी सुधारण्याबाबत त्यांना सल्ला वा उपदेश देणारा नाही, ही ह्या लिखाणाची जमेची बाजू.

७. देशातील आजचा जो लढा आहे तो आपला, आपल्याविरुद्ध; स्वातंत्र्य-लढ्यासाठी तयार झालेली नेतृत्वाची मानसिकता ह्या लढ्यासाठी कामास येणार नाही. क्षोभ व्यक्त करण्यासाठी प्रक्षुब्ध जमावाची शक्ती वापरून दंगलीच्या माध्यमातून एकमेकांची वा शासकीय संपत्ती उध्वस्त करून आपण आपले नुकसान करून घेत असतो. स्वातंत्र्यलढ्यादरम्यान शासन ब्रिटिशांचे होते, आजचे शासन प्रजासत्ताक देशाचे, आपले आहे, हे आपण विसरून चालणार नाही. म्हणून, संघर्ष पूर्णपणे टाळावा. कदाचित, तशी आदर्श वागणूक शक्य नसेल, तर संघर्षाचे स्वरूप शांतीपूर्ण असावे. खरे तर, निगोसिएशन (सल्ला-मसलीतून मार्ग काढणे) हाच आजच्या व्यापक चळवळीचा पायाभूत उद्देश असावा आणि सर्व प्रबोधन त्या उद्देशाला अनुसरून असावे.

ह्या विषयावर प्रस्तुतच्या लिखाणात काही प्रबोधन सादर केले गेले असते तर ते उचित ठरले असते.

८. भारतातील व्यापक चळवळींचे बहुतेक नेतृत्व स्वातंत्र्यलढ्याच्या मानसिकतेत गुरफटलेले आहे. सामाजिक नेतृत्वाने स्वत:ची मानसिकता 'आज'च्या लढ्या-साठी अनुकूल व समर्पक करण्याच्या गरजेला मी प्राधान्य देतो. ते साधले, की गरजेच्या प्रबोधनाचे आकलन अपोआप साधेल.

९. 'आज'च्या लढ्यासाठी सामाजिक चळवळीचे स्वरूप कसे असावे, हा एक निराळा पण महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या संदर्भात सर्व समाजकारण्यांचा उद्देश एकच असावा, 'वंचितांनी स्वत:चा विचार करावा, विकास साधावा, विभाजनवादी धर्मवाद्यांच्या राजकारणाला बळी पडू नये'. सर्वांच्या हेही लक्षात येते, की वंचितांनी एकत्रित व्हावे आणि त्या एकजुटीतून शासनावर दबाव आणावा. ते आज साधले जात नाही, कारण ह्या देशात वंचितांचे विभाजन साधण्याकरता निव्वळ धर्म हे एकच कारण उपलब्ध नाही, तर जात, प्रांत, भाषा वगैरे अनेक सबबी उपलब्ध आहेत.

**विभाजन राजकारण्यांच्या कामास येते हे जागतिक सत्य आहे आणि त्या सत्यात कधीही, कोणत्याही बदलाची अपेक्षा करणे हा भाबडेपणा आहे**

वंचितांची शक्ती जर एकवटली तर त्यांनाच त्यांचे भले साधता येईल. तसे होऊ देण्याकरता आपले संविधान समर्थ आहे, आणि सर्वांनाच ते माहीतसुद्धा आहे. म्हणूनच, राजकारण्यांनी ही वंचितशक्ती एकवटू दिलेली नाही. त्याला मुख्य कारण आहे, ते म्हणजे, वंचितांचे नेतृत्व विभागलेले आहे. तसे नसते तर डॉ. पुनियानी ह्यांनी 'आपापले नियत कार्यक्रम चालू ठेवूनदेखील या चळवळी एकत्र येऊन महासंघटन बांधू शकतात आणि आपल्या कार्याला एक व्यापक आशय देऊ शकतात.' असे विधान प्रस्तुतच्या पुस्तकात केलेच नसते, किंबहुना हे पुस्तक लिहिण्याची वेळच त्यांच्यावर आली नसती!

१०. गेल्या सात-आठ वर्षांतील विचारांच्या एका टप्प्यावर, मी पण वंचिताच्या एकीकरणासाठी एका चळवळीची रूपरेषा तयार केली होती. ग्रंथाली प्रकाशनाच्या 'विकासाच्या वाटा - महाराष्ट्राच्या अनुभवनातून' ह्या पुस्तकातील 'गरज आहे भगीरथाची' ह्या प्रकरणात ती सादर करताना मी त्या कल्पनेला स्वप्नरंजन ठरण्याची शक्यता व्यक्त केली होती. प्रतिक्रिया देताना तर प्रा. शरद कुळकर्णी ह्यांनी त्या विशेषणाच्या पुढे जाऊन, त्या चळवळीला स्वप्नभ्रम म्हटले होते; आणि दुर्दैवाने ते बरोबर आहे, हे मानणे गरजेचे भासते. कारण, एक तर कोणत्याही प्रकारचे प्रौढांचे प्रबोधन साधणे खूप कठीण असते आणि देशातील साऱ्यांचीच मानसिकता विभाजनाला पोषक असल्यामुळे व ते कायम राखून-वाढवून सत्ता टिकवून ठेवणे हे राजकीय कर्तव्य असल्यामुळे, राजकारण्यांनी सतत त्या मार्गाचा अवलंबन करणे ही एक साहजिक बाब आहे. म्हणूनच, कोणी कितीही आदळआपट केली, कोणतेही प्रयत्न केले तरी आजच्या परिस्थितीत वंचितांचे ऐक्य साधणे कोणालाही शक्य होणार नाही, ह्या विचाराप्रत मी ओघाने येऊन पोचलो आहे.

अखिल सामाजिक नेतृत्वाचे, सच्चा समाजकारण्यांचे प्रयत्न वंचितांच्या विभाजनाला 'खो' देण्याचेच असले पाहिजेत. त्या उद्देशाला सामोरे जायचे तर नेतृत्वाच्या प्रबोधनाला पर्याय नाही, हेही तेवढेच खरे. साऱ्या रंगांच्या नेतृत्वाने, विविध गटांनी धार्मिक वा इतर वादांतून चिघळणाऱ्या मुद्यांवर भाष्य करून दुसऱ्या गटाचे काय चुकते, हेच स्वत:च्या अनुयायांना व इतर गटांच्या नेतृत्वाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्या साऱ्याचा परिणाम म्हणजे 'आम्ही विरुद्ध ते' अशा तऱ्हेची मानसिकता समाजात तयार होऊन विभाजन कायम राहिले आहे, हे लक्षात तरी आलेले

नाही वा त्याकडे आम्हा साऱ्यांचे दुर्लक्ष झाले आहे, होते आहे.

मला असे वाटते, की वंचितांना एकत्र आणण्यासाठी आपल्या साऱ्यांचे जे प्रयत्न व्हायला पाहिजेत ते वंचितांच्या नेतृत्वाच्या एकीकरणावर. त्याकरता, प्रत्येकाने विचार केला पाहिजे, की मुळात मी समाजकारणी आहे का राजकारणी? ह्या संदर्भात, समाजकारणासाठी राजकारण, ही स्वत:ची फसवणूक आहे, हे आम्ही लक्षात घेतले पाहिजे. खऱ्या समाजकारण्यांनी जर धर्म, जात, प्रांत, भाषा, इझम (विचारसरणी), वगैरे विभाजनवादी रंगांची कात टाकली तर ते तळपू लागतील व त्या प्रकाशात वंचितवर्गालासुद्धा मार्ग दिसेल. म्हणून, गरज आहे ती नेतृत्वाच्या प्रबोधनाची. तो वाचकवर्ग नजरेसमोर ठेवूनच प्रस्तुतचे पुस्तक लिहिले गेले आहे, ही गोष्ट खूप महत्त्वाची.

११. आजच्या सामाजिक चळवळींचं, समाजाच्या लढ्याचे स्वरूप बदलले पाहिजे; हा काही स्वातंत्र्य लढा नाही वा संघर्षसुद्धा नाही आणि तो गरजेशिवाय आंदोलनात्मकही नसावा.

पन्नास-साठ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर देशाची परिस्थिती सुधारलेली आहे. शासनाचा तात्त्विक दृष्टिकोनही वेगळा आहे. सामाजिक तत्त्वे, स्वातंत्र्य, समता, वंचितांचे हक्क, ह्या गोष्टींना कोणी विरोध करू शकत नाही, करतही नाही. गेल्या साठ वर्षांत ह्या तत्त्वांनुसार अनेक पोषक कायदे विविध शासनांनी मंजूर केले आहेत.

देशाची आर्थिक प्रगती तुलनात्मक-दृष्ट्या समाधानकारकच आहे. अन्नधान्याची विवंचना नाही, भूकबळी पडतात पण त्या गोष्टीला अन्नधान्याचा तुटवडा हे कारण नसते. उद्योगधंद्यांच्या प्रसारामुळे, वाढलेल्या क्षमतेमुळे नॅशनल (राष्ट्रीय) व पर कॅपिटा (वैयक्तिक) उत्पन्नात वृध्दी झाली आहे. रोगराई काबूत आहे, साक्षरता व शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताला मानाचे स्थान आहे, सीमारेषांवर कुरबूर चालू असते, पण युद्धाची भीती, नसल्यात जमा आहे.

अर्थात हे सारे बघणाऱ्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते!

मी सकारात्मक दृष्टिकोनातून अशा-करता बघतो, की शासनावर योग्य दबाव आला तर आजच्या शासनाला, कोणत्याही पक्षाच्या शासनाला, मानव-विकासाकडे, समाजविकासाकडे लक्ष देण्यासाठी आर्थिक सामर्थ्य व फुरसत आहे. तसा यशस्वी दबाव निर्माण केला, तर येत्या वीस-पंचवीस वर्षांत भारतात खरी समाजवादी लोकशाही अंमलात आणता येईल.

आजच्या सामाजिक चळवळीचे प्रयत्न त्या दिशेने व्हायला पाहिजेत. त्या दृष्टीने विचार करण्यासाठी काही मुद्दे मांडतो:

११.१ राज्यशास्त्रात उपलब्ध असलेली उत्तम राज्यपद्धत, लोकशाही व उत्कृष्ट संविधान आपल्याला लाभलेले आहे आणि देशात त्या गोष्टी प्रस्थापितसुद्धा झाल्या आहेत.

११.२ लोकशाहीत शासनावर परिणामकारक दबाव नसेल तर राज्यकर्ते, माणसेच ती, मनमानी करतात. वंचितांचा समर्पक दबाव शासनावर पडण्यासाठी त्यांचे विभाजन टाळले पाहिजे. शासनातील राज्यकर्त्यांना विभाजन गरजेचे असते आणि त्यांच्या कारवाया त्याच दिशेने होत राहणार. हे दुष्टचक्र आहे, ते छेदले पाहिजे.

११.३ निरक्षरतानिर्मूलन व शिक्षणाचा प्रसार व्हावा तसा झालेला नाही, त्याला कारण वंचितांचे दारिद्र्य; आजही कोट्यवधी कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहेत. ह्याच कारणामुळे राजकारण्यांना विभाजन साधणे, राखणे सोपे जाते, हे समाजकारण्यांनी लक्षात घेतले पाहिजे. खरा रोग दारिद्र्य हा आहे; भाषा, प्रांत, जात, धर्म, ही वरवरची लक्षणे आहेत. कोणतीही सामाजिक चळवळ रोग बरी करण्यासाठी असली पाहिजे, लक्षणांवर इलाज म्हणजे फक्त तात्पुरता आराम.

११.४ वंचितांच्या नेतृत्वाने एकत्र येऊन शासनावर दबाव आणला पाहिजे आणि डॉ. पुनियानि ह्यांनी आपल्या पुस्तकात अशाच प्रकारची अपेक्षा, आपल्या पद्धतीने व्यक्त केली आहे.

१२. विविध क्षेत्रांतील, विविध विचारसरणींच्या सामाजिक नेतृत्वाने ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की त्यांना जे अपेक्षित आहे ते एकेकट्याने साधणे कदापी शक्य नाही; राजकारणी तसे होऊ देणार नाहीत. आपापली तत्त्वप्रणाली, हेवेदावे विसरून, एकत्र येऊन राजकारणी जसा युतीकरता 'कॉमन मिनिमम प्रोग्रॅम' ठरवतात, तसा 'वंचितांचा एकत्रित दबाव निर्माण करणे' ह्या एकसुत्री 'अंजेण्ड्या'साठी सामाजिक नेत्यांनी युती साधली पाहिजे. समाजकारण्यांच्या तशा युतीशिवाय राजकीय नेतृत्वाच्या नावाने शंख करून काहीही साधले जाणार नाही.

१३. शिक्षणातून वंचितांचा विकास साधला जाईल. शिक्षणामुळे जशी वैचारिक क्षमता वाढते, तद्वत उदरनिर्वाहाच्या, उपजिविकेच्या साधनांसाठी विविध पर्याय उपलब्ध होतात; त्यातून जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारते. 'राजकारण्यांकडून चिथावले जाऊ नका' ह्या गोष्टीच्या आकलनाला जशी वैचारिक क्षमता गरजेची आहे, तद्वत, त्यासाठी पोट पण भरलेले असावे लागते. शिवाय, थोडेसे आर्थिक स्थैर्य आले, काही प्राप्त झाले, की दंगलीत सहभागी झाल्यावर होणाऱ्या नुकसानीचे प्रमाण वंचितांना जाणवण्याइतपत वाढलेले असते. मध्यम व श्रीमंत वर्गांना दंगलीकरता चिथावणे कठीण असते, त्याचे हेच कारण आहे; भावना तर त्यांच्याही भडकावता येतात, राजकारणी ते साधतातसुद्धा. जनते-कडे गमावण्यासाठी काहीतरी असेल तर समाजाला भडकवून दंगली घडवून आणणे

राजकारण्यांनासुद्धा कठीण जाईल.

भारतात समर्पक समाजकारण साधण्यासाठी वंचित समाजाला शिक्षणाकडे वळवले पाहिजे. प्रबोधनातून वंचित प्रौढांना स्वत:च्या नाही तरी निदान त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचे मोल उमजले पाहिजे. कितीही अडचणी आल्या तरी, किमान, ते आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाच्या आड येणार नाहीत, हे साधले पाहिजे; त्यांनी जातीने लक्ष देऊन पुढाकार घेतला तर उत्तमच! उद्याच्या पिढीच्या शिक्षणाचे महत्त्व पटून प्रचार व शिक्षणाचा प्रसार साधण्यासाठी साऱ्या समाजकारण्यांना एका छताखाली येण्याकरता काही हरकत नसावी. एक-दोन पिढ्या शिक्षित झाल्या तर समाजाचा रंग पालटेल.

डॉ. पुनियानी ह्यांच्या शब्दात 'आपापल्या नियत' कार्यक्रमांत, रचनात्मक कार्यात रमलेल्या सर्वांनी त्यांच्या नियोजित कामाव्यतिरिक्त शिक्षणप्रसाराच्या चळवळी-कडे थोडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी काही अग्रक्रमाच्या कामांकडे बघू.

१३.१ वंचितांच्या पोटापाण्याच्या गरजा व निवाऱ्याचे प्रश्न हलके करून त्यांना त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवण्यासाठी प्रबोधन साधणे.

१३.२ स्थानिक पातळीवर वंचितांच्या उदरनिर्वाहाची नवीन साधने निर्माण करणे.

१३.३ साक्षरता, बालवाडी, बालशिक्षण ह्यासाठी असणाऱ्या शासकीय योजना आपापल्या गावात, परिसरात व्यवस्थित तऱ्हेने अंमलात आणल्या जातात ना, ह्याकडे लक्ष देऊन वंचितांना त्या सोयींचा फायदा घेण्यासाठी सल्ला-माहिती देणे, प्रबोधन करणे, गरज पडल्यास अशा सोयी आपापल्या संस्थेतर्फे उपलब्ध करणे.

शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांतर्गत उपलब्ध वित्तसाहाय्य योग्य ठिकाणी स्थानिक पातळीवर वापरले जाते का नाही ह्याकडे लक्ष देणे, गरजेच्या इतर सवलतींकरिता स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून रदबदली करणे व जरूर तेथे स्थानिक आंदोलनातून त्या गोष्टींकरता शासनावर दबाव आणणे.

१३.४ गावाबाहेरील पुढील शिक्षणाकरता शिष्यवृत्या, माफक व्याजदरात कर्जयोजना, ज्या बचतगटांच्या माध्यमातून उपलब्ध करणे शक्य आहे, वसतिगृह बांधकाम अशी कामे खूप महत्त्वाची. त्याकरता, वित्तसाहाय्य संस्था व खाजगी उद्योगधंद्यांकडून जरूर ती आर्थिक मदत उपलब्ध करता येईल; अनेक संस्था तसे साहाय्य मिळवत आहेत.

१३.५ पोपटलाल पवार, अण्णा हजारे, विजय नारकर असे अनेक सामाजिक नेते प्रामुख्याने हेच, समाजविकासाचे काम करून आपापल्या परिसरात शिक्षणाचा स्तर, समाजाचा दर्जा उंचावत आहेत. गरज आहे ती अशा शेकडो, हजारो सामाजिक नेत्यांची देशव्यापी शिक्षणप्रसारातून वीस-पंचवीस वर्षांत असा सक्षम समाज तयार केला पाहिजे, की राजकारण्यांना गरजेचे असलेले विभाजन साधणे अत्यंत कठीण होऊन बसेल. गरज आहे ती नेतृत्वाने एका छताखाली येण्याची. हीच गोष्ट डॉ. पुनियानी ह्यांना अपेक्षित आहे, जेव्हा ते प्रस्तुतच्या पुस्तकात 'महासंघटनाची' गरज व्यक्त करतात.

**- सु.गो. तपस्वी**
**ए-३/१९, मीनल गार्डन्स्, पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे ४११ ००४.**
**दूरध्वनी : ०२०-२५४१०१४५, २५४६३५१८**

## शैलेश विश्वनाथ त्रिभुवन यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त



मराठी विषयाचे प्रा. शैलेश त्रिभुवन यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्राप्त झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्रा. र.धों. कर्वे संपादित समाजस्वास्थ्य : एक अभ्यास (१९२७ ते १९५३)' या विषयावर शैलेश त्रिभुवन यांनी प्रबंध सादर केला होता.

शैलेश त्रिभुवन हे गेली पंधरा वर्षे मराठी विषयाचे अध्यापन श्री सिद्धिविनायक महाविद्यालयात करत असून त्यांनी यापूर्वी एम.ए., एम.फिल आणि नेट पदव्याही मिळवल्या आहेत. पीएच.डी.च्या संशोधनासाठी त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची दोन वर्षे फेलोशिप मिळाली होती.

'दलित नाटक : प्रेरणा व विकास', 'दत्ता भगत यांची नाटके', 'माझ्या चष्म्यातून', 'साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे', 'भारतरत्न डॉ. धोंडो केशव कर्वे', 'पाटलाची लंडनवारी : काही दृष्टिक्षेप', 'मराठी कथा : चर्चा आणि चिकित्सा', 'चुंबळ', 'साहित्यास्वाद', 'सदानंद देशमुख यांच्या निवडक कथा', 'शैलसंवाद', **'आमचा बाप आन् आम्ही :स्वरूप आणि समीक्षा' (संपादन)** आदी बारा पुस्तके त्यांच्या नावावर असून ते 'कोथरूड-कर्वेनगर' भागात साहित्यिक चळवळ चालवतात.

त्रिभुवन यांना पुणे महानगरपालिकेचा आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. साहित्यक्षेत्रातील अनेक पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत.

# संविधानाची महती

## सुधाकर य. राऊत

जगातील विचारवंतांनी भारतीय संविधान किती श्रेष्ठ आहे हे इतरांना दाखवून द्यावं लागतं त्याचे उदाहरण म्हणजे सुप्रसिद्ध राज्यशास्त्रतज्ज्ञ आणि ऑक्सफर्ड व केंब्रिज या विद्यापीठांचे माजी नामवंत प्राध्यापक अर्नेस्ट वार्कर ह्यांनी १९५७ साली 'प्रिन्सिपल ऑफ सोशल अॅन्ड पोलिटिकल थिअरी' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला. तो त्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेस अर्पण केला आहे. त्या ग्रंथाच्या प्रास्ताविकात ते म्हणतात, माझ्या प्रस्तुत ग्रंथाचे विचाराचे सार ह्या उद्देशपत्रिकेत सामाविलेले आहे. भारतीय जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा प्रारंभ करताना ह्या श्रेष्ठ मानवी मूल्यांचा अंगिकार केला ह्याचा मला अभिमान आहे.

हे जेव्हा मी वाचले तेव्हा मलासुद्धा समजले की आपले संविधान किती महान आणि श्रेष्ठ आहे! तसे पाहिले तर आपला देश अठरापगड जातींचा. त्यांतील अनेक धर्म, त्यांची समता, त्यातील त्यांचा बंधुभाव हे सगळे जोपासून त्याच्यासाठी संविधान निर्माण करणे किती कठीण काम. त्यात आपल्या देशात राजेशाही होती, ती संपुष्टात आल्यानंतर आपण दीडशे वर्षे गुलामगिरीत काढली. जे राजे होते ते ब्रिटिश सरकारचे मांडलिक बनले होते. त्यांच्याकडे संस्थाने होती. काही संस्थानिकांनी स्वातंत्र्याला विरोधही केला होता आणि देशात जातीयता लोकांच्या नसानसामध्ये रुजली होती.

एक उपेक्षित समाज गावाच्या वेशीवरील उकिरड्यावर खितपत पडला होता. हा दलित समाज शिक्षणापासून वंचित होता. त्यांना शिक्षणाची दारे खुली नव्हती. त्याची पडछायादेखील सहन होत नसे. अशा उपेक्षितांना मुख्य प्रवाहात आणायचे हे महान कार्यदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना करायचे होते.

आपला देश स्वतंत्र झाला खरा, पण त्याचे दोन भाग पडले होते. भारत आणि पाकिस्तान. त्यामुळे मुसलमान धर्मातील लोकांची विभागणी झाली. त्यांची अस्मिता जोपासावी लागली. अनेक बारकावे पाहावे लागणार होते. त्यासाठी प्रचंड ज्ञानी व्यक्तीचीच गरज होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रचंड ज्ञान होते. त्यांची विद्वत्ता फार महान होती. आपल्या देशात अनेक प्रांत, विविध बोलीभाषा त्यात प्रांतीय वाद, भाषिक वाद यांचा अभ्यास करून त्या त्या प्रांतातील वाद आणि भाषिक वाद यांतील त्यांची अस्मिता जोपासली गेली आहे.

आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला आणि घटना समितीही स्थापन झाली. त्यावेळचे व्हाईसरॉय लुई माऊंटबॅटन यांनी पंतप्रधान पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांना विचारले आपण आपली घटनासमिती स्थापन केली. त्यातील सदस्य कोण आहेत. त्यावेळी पंतप्रधान पंडित नेहरूजी यांनी व्हाईसरॉय माऊंटबॅटन यांना सांगितले, आम्ही या घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती केली आहे. हे वाक्य ऐकताच लुई माऊंटबॅटन यांनी आपले मत प्रगट केले, भारताचं संविधान फक्त डॉ. आंबेडकरच निर्माण करू शकतात!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जगातील सर्व सुधारलेल्या राष्ट्रांच्या घटनात्मक कायद्याचे व त्याच्या अंमलबजावणीचे प्रचंड ज्ञान होते; तसेच १९३५च्या कायद्याचे बारकावेही माहीत होते.

संविधान निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांना जो कालखंड लागला तो असा आहे.

संविधान समितीची पहिली सभा ६ डिसेंबर १९४६ व शेवटची सभा २५ नोव्हेंबर १९४९ रोजी. म्हणजेच दोन वर्षे, अकरा महिने, सतरा दिवस एवढा कालखंड संविधान निर्माण करण्यासाठी लागला. संविधान सभेची एकूण अकरा सत्रे पार पडली. यांपैकी सहा सत्रे उद्दिष्टपूर्तीचा ठराव पारीत करणे आणि मूलभूत हक्क केंद्रीय संविधान केंद्राचे अधिकार प्रांतिक संविधान. अल्पसंख्याक या समित्यांच्या अहवालावर आणि अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती यावर विचारविनिमय करण्यासाठी खर्ची पडली. सात-आठ-दहा आणि अकरा ही सत्रे मसुदा संविधानाच्या विचार विनिमयार्थ उपयोगात आणली गेली. संविधान सभेच्या अकरा सत्रांचे प्रत्यक्ष कामकाजाचे १६५ दिवस. त्यांपैकी मसुदा संविधानाच्या विचारार्थ ११४ दिवस उपयोगात आणले गेले.

जगातील इतर लोकशाही राष्ट्रे आहेत. त्यांना त्यांचे त्यांचे संविधान निर्माण करण्यासाठी जो कालखंड लागला तो जर आपण आपल्या नजरेखालून घातला तर आपल्याला आपल्या संविधानाचा आणि संविधान निर्माण करणाऱ्याचा नक्कीच अभिमान वाटेल.

इतर राष्ट्रे आहेत त्यातील अमेरिका. या देशाची पहिली संविधान सभा २५ मे १७८७ ला झाली आणि चार महिन्यांत १७ सप्टेंबर १८७८ मध्ये तिने आपले काम पूर्ण केले. अमेरिकेच्या संविधानात सात परिच्छेद आहेत. त्यांतील पहिल्या चार अनुच्छेदाची विभागणी एकवीस उपविभागांत केली आहे.

कॅनडाच्या संविधानाची पहिली सभा १० ऑक्टोबर १८६४ला झाली आणि मार्च

१८६७ मध्ये संविधानाचे कायद्यात रूपांतर झाले. त्यांच्या संविधानात १४७ परिच्छेद आहेत यासाठी त्यांना दोन वर्षे पाच महिन्याचा कालखंड लागला.

ऑस्ट्रेलियाच्या संविधान निर्मितीचे कामकाज मार्च १८९१ ला सुरू झाले आणि ९ जुलै १९०० ला संविधानाला कायद्यांचे रूप प्राप्त झाले. त्यामध्ये १२८ परिच्छेद आहेत. त्यांना नऊ वर्षे लागली.

दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्माण-कार्याला ऑक्टोबर १९०८ मध्ये सुरुवात झाली आणि २० सप्टेंबर १९०९ संवि-धानाची परिणती कायद्यात झाली. हे त्यांच्या एक वर्षाच्या परिश्रमात घडून आले. १५३ अनुच्छेद आहेत. सर्वांत लक्षात ठेवण्यासारखी बाब अशी आहे. या चारही राष्ट्रांच्या संविधान निर्मित्यांना संविधान दुरुस्तीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागले नाही. सादर करण्यात आलेल्या स्वरूपात संमत झाले.

आपल्या संविधानात ३९५ अनुच्छेद व आठ परिशिष्टांचा समावेश आहे आणि मसुदा संविधानात ७६३५ दुरुस्ती सुचवण्यात आल्या होत्या. त्यापैकी २४७३ दुरुस्त्या सभागृहात प्रत्यक्ष विचारार्थ सादर करण्यात आल्या. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव हाच आपल्या संविधानाचा गाभा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीला संविधान सादर केले, त्यावेळी त्यांचे भाषण जवळजवळ पंचावन्न मिनिटे चालले होते. त्यावेळी घटना समितीच्या भव्य हॉलमध्ये गंभीर शांतता पसरली होती. सर्व गॅलऱ्या भरगच्च झाल्या होत्या तरी कोणाच्या श्वासाची अगर हातापायाची हालचाल देखील कळून येत नव्हती. सर्व प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित झाले होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर. ते भाषणाच्या सुरुवातीस सांगतात:

''राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.''

संविधानाच्या गुणवत्तेविषयीच्या चर्चेत मी शिरू इच्छित नाही. कारण माझ्यामते संविधान कितीही चांगले असो ते राबवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे. ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही.

भारतातील लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते संवैधानिक मार्गाचा अवलंब करतील की क्रांतिकारी मार्गांचा अवलंब करतील? त्यांनी क्रांतिकारी मार्गांचा अवलंब केल्यास संविधान कितीही चांगले असो, ते अयशस्वी होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर संविधान समितीच्या सदस्यांनी आपले विचार मांडले ते असे आहेत.

घटनासमितीचे सदस्य प्रसिद्ध घटनातज्ज्ञ एस.व्ही. पायती यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे, ''डॉ. आंबेडकरांनी आपल्यासोबत विद्वत्ता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठा व वक्तृत्व आणि अनुभव पणास लावले. क्लिष्ट अशा प्रकारच्या प्रश्नावर देखील अतिशय दुर्लभ अशी पकड होती आणि ते आपली मते अतिशय प्रभावीपणे तितकाच सुलभपणे मांडत. तर्कस्पष्ट, युक्तिवाद, प्रभावी आणि सर्वांना समजणारे स्पष्टीकरण कोणत्याही मुद्याला तत्काळ प्रतिवाद करून वाद संपुष्टात आणण्याची हातोटी त्यांच्या-शिवाय अन्य कोणत्याही सदस्यात नव्हती.

बेगम ऐझाज रेसुल - आपल्या भाषणात सांगतात, संविधानाने भारतीय जनतेच्या आशाआकांक्षांना मूर्तस्वरूप दिले आहे. धर्मनिरपेक्ष राज्य हे आपल्या संविधानाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. धर्मनिरपेक्षतेचे आग्रही प्रतिपादन हे आपल्या संविधानाचे पावित्र्य आहे आणि त्याचा आम्हास गर्व आहे. मला पूर्ण विश्वास आहे की ही धर्मनिरपेक्षता नेहमीच जोपासली जाईल. कलंकित केली जाणार नाही. भारतीय लोकांचे ऐक्य त्यावर अवलंबून आहे. अन्यथा त्याशिवाय विकासाच्या आशा-आकांक्षा व्यर्थ ठरतील. नेत्रदीपक कार्य केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

भारतातील अनेक धर्म आणि जाती म्हणजे अठरापगड जाती. त्यातील त्यांचे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव त्यांना जोपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय क्लिष्ट काम केले आहे. आपली विद्वत्ता पणाला लावून या ज्ञानसागराने आपल्या दैनिक जीवनदिनातील अठरा तास अभ्यास करून, कायद्यांचे बारकावे तपासून संविधानाचा मसुदा तयार केला. स्वत:चे आजार किंवा खाण्यापिण्याची तमा न बाळगता, त्यांनी एकच उद्दिष्ट आपल्या नजरेसमोर ठेवले. डॉ. बाबासाहेब यांनी संविधान निर्माण करण्याचे महान कार्य केले आहे.

भारतीय जनतेने आपल्यावर दाखव-लेला विश्वास हाच आपला बहुमान होय असे हॉ. बाबासाहेब यांना वाटले असावे. इतर लोकशाही देशांतील संविधान मसुदा आपण नजरेखालून घातला आहे. त्यामध्ये त्यांना कोणत्याही दुरुस्तींना सामोरे जावे लागले नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या देशात एकच जात एकच धर्म असल्यामुळे शंका-कुशंका निर्माण झाल्या नाहीत म्हणून त्यांचे संविधान लवकर निर्माण झाले.

आपण अनेक बाजूंनी पाहिले तर सर्वात जास्त काळ आपला संविधान निर्माण करण्यासाठी लागला पाहिजे होता. या महामानवास कोटी कोटी प्रणाम!

**सुधाकर ग. राऊत**
आगरवाडी, सफाळा

# आयुर्वेदातील स्त्रीरोगचिकित्सा

## वैद्य मधुरा पाटील

**वैद्य शुभदा वेलणकर यांचे 'आयुर्वेदीय स्त्रीविज्ञान' हे पुस्तक पुण्यात प्रसिद्ध झाले. त्यावेळी मधुरा पाटील यांचे भाषण...**

आयुर्वेदात 'स्त्रीशरीर-स्त्रीरोग' यांचे वर्णन अतिशय विस्तृत आले आहे. परंतु ते सर्व सूत्ररूप असल्यामुळे काही वेळा त्यांचा नेमका मथितार्थ लक्षात येत नाही. वेलणकर-बाईंनी त्या सर्व चिकित्सासूत्रांची मार्मिकता स्वत:च्या अनुभवातून मांडली आहे आणि त्याबरोबरच व्यावहारिकताही जपली आहे. औषधोपचार आणि आहार्यद्रव्ये ही रुग्णाला त्याचा रोजचा व्याप सांभाळून सहजपणे करता आली पाहिजेत यावर बाईंचा कटाक्ष असतो. स्त्रिया स्वत:च्या औषधोपचाराबाबत कंटाळा करतात. तो विचार डोक्यात ठेवून बाईंनी स्त्रियांच्या हाताशी असणाऱ्या ओवा, आळीव, खारीक, खोबरे अशा पदार्थांचा उपयोग करण्यास सुचवले आहे.

स्त्रीशरीर आणि रोग यांचे विवरण करताना त्यात आयुर्वेदातील काही मूलभूत संकल्पनांचा अर्थ बाईंनी व्यापकपणे स्पष्ट केला आहे. उदाहरणार्थ- दोषांच्या गती, त्यांची प्राकृत कार्ये, आयुर्वेदाचे वेगळेपण सांगणारा अग्नी, तसेच धात्वंतर्गत पचन. अशा दृष्टीने आयुर्वेदीय स्त्रीविज्ञान हे पुस्तक फक्त स्त्रीरोगापुरते मर्यादित राहिलेले नाही.

स्त्रीशरीररचना आणि क्रियाविज्ञान प्रकरणात बाईंनी रज आणि आर्तव या संज्ञांमधील सूक्ष्म फरक स्वत:च्या अनुभवातून कुशाग्रतेने मांडला आहे. त्यानुसार चिकित्सा करणे अतिशय सुकर वाटेल.

मुलगी जन्माला आल्यापासून तो प्रथम प्रसव होईपर्यंत प्रत्येक मुलीला निरनिराळ्या शारीरिक अवस्थांमधून जावे लागते. त्या प्रत्येक शारीरिक अवस्थांतरात तिच्या मानसिकतेत खूप मोठ्या प्रमाणावर बदल होत असतात. त्यामुळे स्त्रीच्या कोणत्याही वयात होणाऱ्या दुखण्यांमध्ये तिच्या मानसिकतेचा विचार करणे अपरिहार्य असते. हा महत्त्वाचा मुद्दा बाईंनी अधोरेखित केला आहे. विशेष करून मुलगी वयात येताना, गर्भधारणा होते. तेव्हा आणि रजोनिवृत्तीच्या वेळी होणारे बदल बाईंनी नेमकेपणाने प्रत्ययास आणून दिले आहेत.

आजकालच्या गतिमान आयुष्य-पद्धतीत आणि अतिरेकी स्पर्धात्मक युगात मुलीच्या शारीरिक वाढीकडे संपूर्णत: दुर्लक्ष केले जाते. मुलगी पंधरा-सोळा वर्षांची झाल्यावरसुद्धा जेव्हा तिची मासिक रजोप्रवृत्ती नियमित येत नाही किंवा तिला या सगळ्याचा कंटाळा वाटू लागतो, त्यावेळी पालकांना या गंभीरतेची जाणीव होऊन औषधोपचारांची शोधाशोध चालू होते. अशा नित्याच्या झालेल्या रुग्णांमध्ये कशा पद्धतीने विचार केला असता चिकित्सा फलप्रद होऊ शकते याचे मोलाचे मार्गदर्शन मिळते. अशा अनार्तवाच्या रुग्णांमध्ये बाईंनी आर्तववह स्रोतसाचे जे पाचभौतिक विवेचन केले आहे त्याचा खूप उपयोग होतो. त्यामुळे अंत:फल, गर्भाशय यांची शरीरक्रिया लक्षात येऊन उपचारांची नेमकी दिशा ठरवायला मदत होते.

सध्या कामांच्या वेळाची व्याप्ती वाढल्यामुळे त्याचा खाण्यापिण्यावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. चंगळवादी जीवनशैलीमुळे उत्कृष्ट पोषणमूल्ये देणाऱ्या आहाराचा अभाव निर्माण झाला आहे. याचा परिणाम 'सप्तधातूंवर' होऊन अनपत्यते-सारखे गंभीर प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. 'अनपत्यता' हा या पुस्तकाचा गाभा आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. मानवी जीवनातील अतिशय नाजूक समजल्या जाणाऱ्या विषयाचे विवेचन बाईंनी मार्मिक-पणे केले आहे. 'एवं मासेन रस: शुक्रीभवति स्त्रीणां चार्तवम्।' या सुश्रुत-संहितेत आलेल्या सूत्राचा खरा अर्थ इथे उलगडला आहे.

बीज म्हणून असणाऱ्या शुक्रार्तवाची वैद्य संवेद्य लक्षणे- त्यावरून अनुमान - त्या अनुषंगाने तर्क या सर्वांचा निश्चितच फायदा होईल. उदाहरणच द्यायचे झाले तर योनिशरीरामध्ये बाईंनी वर्णन केलेल्या योनिगत नाडीचे देता येईल. आजपर्यंत कुठेही फारसे वर्णन न आलेला हा भाग कामशास्त्राच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच सध्या शुक्रार्तवासंदर्भात खूपच टेस्ट केल्या जातात. त्याचा नेमका विचार काय करायचा आणि त्यांचा गाईडलाइन म्हणून कशा उपयोगात आणायचा हा महत्त्वपूर्ण विचार बाईंनी दिला आहे.

स्त्रीरोग वेगवेगळ्या कारणांनी उत्पन्न होत असल्याने त्यात आढळणारी लक्षणे पण विविध असतात. अशा वेळी स्त्रीरोग-चिकित्सेतील वाताचे अनन्यसाधारण महत्त्व बाईंनी सोदाहरण स्पष्ट केले आहे. 'वातदोषाचे स्त्रीशरीरातील महत्त्व' हे प्रकरण या दृष्टीने उद्बोधक आहे.

योनिरोगांची चिकित्सा करताना,
न हि वातात् ऋते योनिर्नारीणां संप्रदुष्यति।
या चरकसंहितेत आलेल्या सूत्राचा उपयोग कसा करायचा हे बाईंनी आपल्या अनुभवातून स्पष्ट केले आहे. अर्थात रुग्ण पूर्ण बरे होताना आम्ही आमच्या विद्यार्थिदशेत अनुभवले आहेच. फक्त त्यामागचा विचार आता स्पष्ट होत आहे.

अशा रीतीने 'आयुर्वेदीय स्त्रीविज्ञान' या पुस्तकाचा प्रवास दोषांच्या प्राकृत स्थितीपासून सुरू होऊन स्त्रीशरीर रचना-क्रिया विज्ञान, योनिरोग, स्तनरोग, गर्भविज्ञान यांद्वारे स्वाभाविक प्रसवाशी येऊन थांबला आहे. सर्वच वैद्यांना याचा निश्चितच उपयोग होईल आणि 'आयुर्वेदिक स्त्रीरोग चिकित्सक' म्हणून प्रॅक्टिस करू इच्छिणाऱ्यांना विशेषकरून फायदेशीर ठरेल.

बाईंनी आज या वयातही खूप सारे श्रम करून एवढा मोठा विषय त्यांच्या अनुभवाच्या कोंदणाने अलंकारित करून पुस्तकबद्ध केला आहे.

**वैद्य मधुरा पाटील**
**सी ४/३ वृंदावन हौ. सोसा.**
**कोथरूड (पुणे) ३०**
**भ्रमणध्वनी ९८२२३०९८१४**

# ‘दरम्यान’ आणि ‘कोसो’

जयवंत चुनेकर

आपण माध्यमातील भाषिक दोषांचा विचार करत आहोत. अर्थातच वृत्तपत्रे हा त्यातला प्रमुख घटक आहे. लेखनाचं छापील रूप वृत्तपत्रांपुरतं मर्यादित नसतं. साप्ताहिकं, मासिकं, पुस्तकं ही देखील लेखनाचं छापील रूप मांडणारी आणि लोकांपर्यंत पोचणारी साधनं. मात्र वृत्तपत्रांतील भाषिक दोष, उणिवा लक्षात आल्या/आणून दिल्या तरी त्या दूर करण्याला अवकाश नसतो; ते व्यवहार्यही होत नसावं. नियतकालिकांच्या बाबतीत मात्र हे शक्य असतं. दोन अंकांतला कालावधी पुरेसा असतो; लेखनाचं स्वरूपही ‘बातमी’पेक्षा अधिक स्थायी असतं. मुद्रितांत दर्शवलेल्या दुरुस्त्या अंमलात आल्याची खात्री करण्याला मुळातच अधिक अवसर असतो. तरीदेखील मुद्रणदोष राहून जातात, पण ‘नियतकालिक’ हे स्वरूप ते मुद्रणदोष दूर करायला वाव देतं.

‘रुची’च्या मे ०८ च्या अंकातल्या माझ्या लेखात काही मुद्रणदोष राहून गेले असे माझ्या लक्षात आले. ते प्रथमत: दूर करणे आवश्यक वाटते. हे दोष येणेप्रमाणे:

| पान | रकाना/ओळ | असे आहे | असे हवे |
|---|---|---|---|
| १५ | दुसरा; वरून १५ व १६ | पुंल्लिंगी | पुंलिंगी |
| | तिसरा; खालून ८ वी | साहेब, राव हे… | साहेब, राव ही… |
| १६ | पहिला; वरून १५ वी | अजतागायत | अजाणता |
| | पहिला; (परिच्छेद ३; पहिली) | कॉम्प्यूटर | कॉम्पयूटर |
| | (परिच्छेद ३; चौथी) | त्यात ऱ्हस्वदीर्घाचे प्रमाण आहेत… | त्यात ऱ्हस्व, दीर्घाचे प्रमाद आहेत… |
| | (परिच्छेद ३; पाचवी) | …काही फरक पडत नाही. तेव्हा… | …काही फरक पडत नाही; तेव्हा… |
| | (परिच्छेद ३; खालून नववी) | मुलांनमध्ये या शब्दाबाबत… | ‘मुलांनमध्ये’ या शब्दाबाबत,… |
| | (परिच्छेद ३; खालून दुसरी) | …उच्चार विरोधामुळे | उच्चार विशेषामुळे |
| | दुसरा; खालून २/३ | …तर फुलांची द्यावीत, फळांची नावे द्यावीत | …तर फुलांची, फळांची नावे द्यावीत! |
| | तिसरा; परिच्छेद २; वरून तिसरी | आकडे. देवनागरी (?) मधील… | आकडे देवनागरी (?) मधील… |
| १७ | पहिला; वरून १ | पुनस्थापित | पुनर्स्थापित |
| | पहिला; परि. २ वरून ३/४ | (लोकमत, १७ मार्च०८ पान ९ | (लोकमत, १७ मार्च ०८ पान ९) |
| | दुसरा; खालून ७ | पण याच बातमीत रूढ झालेले… | पण याच बातमीत, रूढ झालेले… |
| | खालून ५ | …शब्द मराठी करून वापरले आहेत. मात्र | …शब्द मराठी करून वापरले आहेत; मात्र…. |

याच लेखात रस्त्यांच्या नावांच्या उल्लेखातील औचित्याचा विचार मी मांडला होता. ‘लोकसत्ता’च्या २६ मे ०८च्या अंकात ‘लोकमानस’मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका वाचकाच्या पत्रात (‘राज्यात मराठी हवेच’) महनीयांच्या नावांची संक्षिप्त रूपे लिहू नयेत असा मुद्दा मांडला आहे (संदर्भ मात्र थोडा वेगळा आहे). तो वाचून समविचारी माणूस भेटल्याचा आनंद वाटला!

औचित्यविवेक सुटल्याचे एक उदाहरण (मुंबई) ‘सकाळ’च्या ४ मे ०८ च्या अंकातील नाट्यपरीक्षणाच्या सदरात सापडले. या परीक्षणासोबत एका नाट्य-प्रसंगाचे प्रकाशचित्र छापले असून त्याच्या-खाली दिलेल्या ‘कॅप्शन’मध्ये मराठी क्रियापदाशी इंग्रजी ‘एबल’ या विशेषणदर्शक प्रत्ययाचा संकर करून ‘बघणेबल’ असा शब्द उपयोजला आहे. ‘कॅप्शन’ देणाऱ्याला, आपण नवा शब्द घडवल्याचा आनंद वाटला की काय, न कळे. पण असे शब्द भाषेची जाण उथळ असल्याचे निदर्शक असतात. त्यांनी भाषेचे सौष्ठव वाढत नसते; सौंदर्य प्रकट होत नसते. निव्वळ सवंगपणा मात्र ठसतो. असा शब्द गप्पाटप्पांमध्ये खपून जाईल. पण लेखनात त्याचा वापर टाळणेच बरे.

वृत्तपत्रांतल्या बातम्यांत किंवा दूरदर्शनच्या सर्वच वाहिन्यांवरील बातम्यांत ‘दरम्यान’ असा शब्द नेहमी वापरला जातो. बहुतांश वेळा तो सरधोपटपणे किंवा चुकीच्या स्थानी, चुकीच्या अर्थाने वापरला जातो असे दिसते. या शब्दाचे विविध अर्थ आहेत, ते असे: दलाल, मध्यस्थ, मध्यंतरी, मध्येच; चिकटून, लागून, जवळ (संद: दाते-

कर्वे कोश). हे अर्थ लक्षात घेतले, तर घटना वा प्रसंगांमधील अवसर या अर्थाने या शब्दाचा वापर करणे रास्त होईल. मात्र बातम्यांमध्ये तो अत्यंत सैलपणे, अर्थशून्यपणे किंवा उभयान्वयी अव्ययासारखा पादपूरक म्हणून वापरला जातो.

'लोकमत' दैनिकाच्या 'हॅलो मुंबई' या पुरवणीतील (३० मार्च ०८) (पान १) मुंबई विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातील चुकांविषयी बातमीतील या शब्दाचा वापर पाहा: ''या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याला एक सहनिबंधक नेमणे जरुरी झाले आहे, असेही ते म्हणाले'', इथे परिच्छेद पूर्ण होतो. पुढे नवा परिच्छेद सुरू होतो: ''दरम्यान, विद्यापीठातील झेरॉक्स मशीन बाराही महिने बंद असल्याने विद्यार्थ्यांना झेरॉक्स काढायला बाहेर जावे लागत आहे...'' या ठिकाणी 'दरम्यान' हा शब्द वापरण्याचे काही प्रयोजनच नाही. तो अस्थानी, केवळ पादपूरकासारखा(?) वापरला गेला आहे. (या निमित्ताने एक विचार येथेच मांडणे उचित ठरेल. वृत्तसंकलक, बातमीदार, वृत्तनिवेदक, पुरेशी भाषिक पूर्वतयारी करत नसल्याचे हे निदर्शक आहे. भाषेतल्या शब्दांना विविध अर्थच्छटा असतात. त्यांचे बारकावे जाणून घेणे आवश्यक असते. त्यासाठी वेळोवेळी, शब्दकोशांचा आधार घ्यावा लागतो. ही मंडळी शब्दकोश पाहतात तरी का; आणि तो पाहायचा कसा हे तरी त्यांना माहीत असते का, अशी शंका येण्यासारखी स्थिती दिसते!)

असाच आणखी एक शब्द अनुचित प्रकारे वापरला जातो. 'कोसो' (दूर... वगैरे), हिंदीचे हे सरळसरळ आक्रमण आहे. 'कोस' हा शब्द याच अर्थाने, मराठी वळणाने 'कित्येक कोस (दूर... वगैरे)' असा वापरता येतो. मात्र तसा तो वापरता येतो हे विचारप्रक्रियेत जिरलेले असायला हवे. तरच तो त्या प्रकारे लेखणीतून उतरेल!

'लोकमत'मधील ज्या बातमीचा वर उल्लेख केला, त्या बातमीतील त्याच परिच्छेदातील लगत पुढचे वाक्य पाहा : ''यातील प्रसाधनगृहांची स्थिती रेल्वे-स्टेशनच्या प्रसाधनगृहांपेक्षा खराब असल्याचे प्रकाश दडेकर यांनी निदर्शनास आणले आहे.'' बातमीमधील 'यातील' शब्दाचा संबंध कशाशी जोडायचा? आधीचे वाक्य झेरॉक्स मशीनची अवस्था सांगणारे आहे! एक तर येथे वेगळा परिच्छेद सुरू व्हायला हवा होता. 'तसेच विद्यापीठातील' अशा किंवा तत्सम शब्दाने त्याची सुरुवात करणे अपेक्षित होते. याच परिच्छेदातले शेवटचे वाक्य असे आहे : ''विद्यार्थ्यांना रिव्हॅल्युएशनचे (पुनर्मूल्यांकनाचे?) निकाल वेळीस न लागल्याने वर्ष फुकट जात आहे, याबाबत कसोटीने विचार करणे जरुरीचे आहे.'' एकाच वाक्यात तीन चुकीचे शब्दप्रयोग! 'विद्यार्थ्यांना'ऐवजी 'विद्यार्थ्यांचे', 'वेळीस'ऐवजी 'वेळीच', 'कसोटीने'च्या ठिकाणी 'कसोशीने' असे शब्दप्रयोग हवेत! याही बातमीत पुन्हा 'दरम्यान'चा चुकीचा वापर आहेच. शिवाय, 'दरम्यान वेदक यांनी शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाकरता विद्यापीठ प्रशासनाने मंजूर केलेल्या रकमेपेक्षा जास्त पैसे खर्च केल्याचे निदर्शनास आणले.' या वाक्यात 'वेदक यांनी' ही कर्तृत्वपदाची शब्दसंहती 'खर्च केल्याचे' या शब्दानंतर वापरली असती तर शब्दसाहचर्याचा प्रमाद टळला असता.

एकाच बातमीत किती भाषिक प्रमाद! तेही विद्यापीठासारख्या, शिक्षण देणाऱ्या संस्थेसंबंधी बातमीत हे प्रमाद असावेत हे गंभीरच!

'रंगेहाथ' हा आणखी एक अकारण रूढ केला गेलेला परभाषिक शब्द. 'लोकमत' (१ एप्रिल ०८)च्या अंकातील हे शीर्षक बघा : 'मोलकरणीच्या दक्षतेमुळे लुटारूंना रंगेहाथ अटक.' 'रंगेहाथ' म्हणजे 'पुराव्यानिशी'च ना? मग तोच शब्द का वापरायचा नाही? 'रंगेहाथ'मुळे वाक्याचे सौंदर्य खुलले? हे असे परभाषिक आक्रमण थोपवणेच चांगले!

वाक्यरचना करताना थोडे अधिक दक्ष राहिले तरीसुद्धा वाक्यातील छोट्याशा चुकीमुळे आलेली संदिग्धता टाळता येते. 'सामना'मधील (२९-४-०८) सिंधु महोत्सवासंबंधी बातमीतील (पान ८) हे वाक्य बघा : 'सर्वाधिक चार्टर्ड विमाने... अम्स्टर्डेमधून प्रत्येकी आठ चार्टर्ड विमाने गोव्यात दाखल झालीत. तर यावेळी यात आणखी भर पडली. 'फ्रँकफर्ट'चे ऑक्टोबर महिन्यातच दोनशे पासष्ट प्रवाशांना घेऊन (कोंडोर) हे विमान दाखल झाले.' या वाक्यात 'यात आणखी भर पडली', यानंतर पूर्णविराम दिला असता तर वाक्यरचनेचा तोल बरोबर साधला गेला असता. शिवाय, 'अम्स्टरडॅम'-ऐवजी 'ॲम्स्टर्डे'; (कोंडोर हे) या ऐवजी (कॉडोर) हे अशा चुकाही आहेतच. 'फ्रँकफर्ट'चे या शब्दाची योजना 'ऑक्टोबर महिन्यातच' यापुढे केली असती तर शब्दसाहचर्याचा दोष वाक्यात न शिरता.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या २० मार्चच्या अंकात विज्ञान कादंबरीकार आर्थर सी. क्लार्क यांच्या निधनाची बातमी आली आहे. चार छोट्या परिच्छेदांच्या या बातमीत सदोष वाक्यरचना असलेले दोन परिच्छेद आहेत. 'त्यांनी स्वत:ला इलेक्ट्रॉनिक जगात बंदिस्त करत केवळ मॉनिटर, रेडिओ आणि कॉम्प्युटरच्या साह्याने जगाच्या संपर्कात राहिले.' अधोरेखित शब्दयोजना, कर्त्याच्या ('त्यांनी') लिंग-वचन-विभक्तीस अनुसरून 'जगाशी संपर्क ठेवला' अशी असणे आवश्यक होते.

पुढच्याच परिच्छेदातील 'ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांनी १९९८मध्ये विज्ञान जगातील एक श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून सन्मानित केले होते' या प्रारंभिक वाक्यात 'विज्ञान जगतातील' यापूर्वी 'त्याना' हे कर्मपद आवश्यक होते.

पुन्हा, त्या नंतरच्याच वाक्यात सदोष वाक्यरचना आहे. 'एक विज्ञान कादंबरीकार म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केल्यानंतर त्यांनी पाण्याखालचे जग, विज्ञानाची लोकप्रियतेसाठी बरेच लेखन केले. वाक्यात 'पाण्याखालचे जग' आणि 'विज्ञानाची' या दोन शब्दसंहतींमध्ये काही शब्द, वाक्यांश गळले असावेत; तसेच 'विज्ञानाची' नंतरही शब्द गळला/गळले आहे/आहेत हे स्पष्टच आहे. 'त्यांनी' यातील अनुस्वार अनावश्यक. 'नी' हा प्रत्ययच नामाचे/सर्वनामाचे आदरार्थी रूप दाखवतो. सबब पुन्हा अनुस्वाराची गरज नाही.

त्यापुढील वाक्यही पुन्हा सदोष! 'त्यांचे घर मानलेल्या श्रीलंकेत शांतता नांदावी अशीच त्यांची इच्छा होती.' श्रीलंकेला घर कुणी मानले? इतरांनी नाही; त्यांनी स्वत:च. मग वाक्य असे हवे : 'त्यानी ('त्यांनी' नव्हे) आपले घर मानलेल्या श्रीलंकेत...'

छोट्या वृत्तात किती हे भाषिक प्रमाद! आणि अनौचित्याचे उदाहरण अग्रलेखातच!

'लोकमत'च्या ३० मार्च ०८ च्या अग्रलेखातले ('नवे गौरीशंकर') हे वाक्य पाहा: 'शोलेतल्या वीरूच्या पाण्याच्या टाकीवरील नौटकी इतकाच आनंद क्रिकेट-मधल्या या वीरूने क्रिकेटरसिकांना दिला.' अशी तुलना अग्रलेख लिहिणाऱ्या (संपादकांनी) करावी हे, दोन्ही प्रसंग नजरे-समोर आणल्यास, सवंगपणाचे आहे, हे सहज लक्षात यावे. (संदर्भ आहे तो वीरेंद्र सहवागने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध केलेल्या त्रिशतकाचा). अग्रलेखात, 'त्याची शैली झंझावाती असली त्याला तंत्राचे अधिष्ठान आहे', असेही एक सदोष वाक्य आहे. यात 'असली'च्या ठिकाणी 'तरी' हा शब्द हवा.

काही सदोष वाक्ये/शब्द आणि त्यांची दोषरहित रचना यांचे फक्त हे दिग्दर्शन : (पुढील दोन स्तंभांत)

| **सदोष रचना** | **दोषरहित रचना / शब्द** |
| --- | --- |
| १. अमृता रावने एका पाकिस्तानी बॅण्डबरोबर चमकली आहे. | अमृता राव एका पाकिस्तानी बॅण्डबरोबर चमकली आहे. |
| २. अमृता या व्हिडिओत नाचनाचाा दिसते. (मुंबई सकाळ; १ एप्रिल ०८) | अमृता या व्हिडिओत नाचताना दिसते. |
| ३. 'एन् आयई' अंतर्गत अंधश्रद्धेविषयी विद्यार्थ्यांशी संवाद (शीर्षक) | अंधश्रद्धेविषयी विद्यार्थ्यांशी 'एनआयई' अंतर्गत संवाद |
| ४. हायकोर्टाचा उल्हासनगर रेल्वे व पालिकेला आदेश (उपशीर्षक) (महाराष्ट्र टाइम्स; ४ एप्रिल ०८) | उच्च न्यायालयाचा रेल्वे व उल्हासनगर पालिकेला आदेश |
| ५. सिद्धिविनायक मंदिरासमोर असलेले राजे संभाजी पार्क म्हणजेच नर्दुल्ला टँक मैदानाची दूरावस्था... (लोकमत; हॅलो मुंबई, २९-एप्रिल ०८) | अधोरेखित शब्द 'असलेल्या' व 'दुरवस्था' असे हवेत. |
| ६. 'विधिज्ज्ञ'ही आता साधताहेत डॉलर कमाईची संधी!' (शीर्षक) ('लोकसत्ता' मे, पान ९) बातमीतही सर्व ठिकाणी 'विधिज्ज्ञ' असा चुकीचा शब्दवापर. | 'विधिज्ज्ञ' ह्या शब्दाऐवजी 'विधिज्ञ' असा शब्द हवा. शब्द वापरणाऱ्याने 'तज्ज्ञ'च्या धर्तीवर, संस्कृत भाषेच्या/संधिनियमाच्या अज्ञानामुळे हा शब्द बनवलेला दिसतो. 'तज्ज्ञ' हा संधियुक्त शब्द आहे. तत्+ज्ञ (म्हणजे 'त्याचा'/'त्यातला' जाणकार) अशी याची फोड आहे. यातल्या 'तत्'मधील 'त्' व पुढील 'ज्ञ' यांचा संधी होऊन 'तज्ज्ञ' असा शब्द बनतो. 'विधिज्ज्ञ'मध्ये तसे होत नाही. तेथे 'विधि+ज्ञ' (म्हणजे कायद्याचा जाणकार) अशी संधीची फोड होते. |

जाता जाता : शशिकांत सखाराम कारेकर, अंधेरी (प.) ह्या 'रुची' वाचकानी एप्रिल ०८च्या अंकातील माझ्या लेखाची दखल घेतली आणि मला पत्र पाठवले. ह्या प्रतिसादामुळे माझ्या विचारांना बळ मिळाले. कारेकरांनी इतर काही मुद्दे उपस्थित केले आहेत. परंतु त्याविषयी पुढील लेखात.

**जयवंत वसंत चुनेकर**
**अहमद सेलर बिल्डिंग्ज, बि.क्र. ८**
**खोली क्र. २७, स.मो. जाधव मार्ग,**
**नायगाव, दादर, मुंबई ४०० ०१४**
**दूरध्वनी : २४१३५२७४**
**भ्रमणध्वनी : ९९६९०३१९३५**

३ ऱ्या वर्षात पदार्पण
पुस्तकांना
तुमच्यापर्यंत
पोचवणारा
वाचनसंस्कृतीचा
आपुलकीचा
दुवा
प्र प्रल्हाद
ग्रंथविक्री व वितरण
प्रल्हाद अकोलकर
मोबाईल : ९८९२०७१२५८
फोन : ९५२५० - २४५६२६५

# दहशतीचे दशावतार!

अरुण मोकाशी यांचे 'तांबडं रक्त : नवा हल्ला' आणि कुमार नवाथे यांचे 'नाझी नरसंहार' आा दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ 'ग्रंथाली'ने मे महिन्यात घडवून आणला. त्यावेळी 'दहशतीचे दशावतार' या विषयावर चर्चा झाली...

सतीश राजमाचीकर यांनी दोन पुस्तकांचे एकत्र प्रकाशन करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. जो 'शिंडलर्स लिस्ट' हा चित्रपट पाहून कुमार नवाथे प्रभावित झाले त्या शिंडलरचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे, २३ एप्रिल हा ग्रंथदिन आणि १ मे हा महाराष्ट्रदिन या तीन प्रसंगांचे औचित्य साधून 'ग्रंथाली'ने हा प्रकाशनसोहळा आयोजित केला, असे ते म्हणाले.

लेखकद्वयाच्या भाषणानंतर प्रकाशन सोहळ्यानिमित्त असलेल्या चर्चेला सुरुवात झाली. प्राध्यापक अरुणा पेंडसे, नरेंद्र जाधव आणि कुमार केतकर या मान्यवरांना चर्चेसाठी आमंत्रित केले होते. चर्चेचा विषय होता– 'नाझी ते तालिबान दहशतीचे दशावतार.' त्यात उपप्रश्न होता– हा राजकीय रोग कधी संपेल?'

पुस्तकांचे प्रकाशन नरेंद्र जाधव व कुमार केतकर यांच्या हस्ते एकाच वेळी झाले. त्यानंतर 'दहशतीचे दशावतार' या विषयावर या दोन पुस्तकांच्या निमित्ताने चर्चा झाली.

प्राध्यापक अरुणा पेंडसे यांनी चर्चेला सुरुवात केली.

**अरुणा पेंडसे –** मला 'ग्रंथाली'ने चर्चेला बोलावले आहे त्याचे कारण मी राज्यशास्त्राची प्राध्यापक आहे. या दोन्ही पुस्तकांत मला काही साम्य दिसत आहे. एक असे की दोन्ही पुस्तके फार संवेदनशीलतेने लिहिली आहेत. 'नाझी नरसंहार'च्या प्रास्ताविकात ज्या हत्याकांडाचे उल्लेख आहेत, संहार करण्याच्या वृत्तीचा उल्लेख आहे तशी हत्याकांडे आपल्याकडेही होतात, पण त्याला नरसंहार म्हणत नाहीत. म्हणून मला नेहमी प्रश्न पडतो, की 'एका वेळेला किती माणसे मारली गेली की 'नरसंहार' म्हणायचे?' केवळ माणसे मारणे म्हणजे हिंसा नाही तर धार्मिक, भाषिक दंगलींत मारहाण करणे, भीती दाखवणे हासुद्धा हिंसेचा आविष्कार आहे. नाझी हिंसा निंद्य आहे. रवांडा, बॉस्निया येथे जे घडले तेसुद्धा निंद्यच आहे. आपल्याकडेही हे घडण्याची शक्यता आहे हा मुद्दा लेखकांनी मांडला आहे. यातील लेखकाची संवेदनशील भूमिका मला महत्त्वाची वाटते.




**दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन : डावीकडून कुमार नवाथे, अरुण मोकाशी, नरेंद्र जाधव, कुमार केतकर, अरुणा पेंडसे**

मला आणखी एक वाक्य महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, 'लँग्वेज ऑफ स्लॉटर' लिहिणे फार कठीण आहे, पण ते जरुरीचे आहे. त्यांनी हिंसा कशी झाली ते तपशिलाने लिहिले आहे. आपल्याकडे असे लिहिणे नेहमी टाळले जाते, पण ते करणे जरुरीचे आहे असे मला वाटते. नाहीतर हिंसेचा फक्त तो आकडा राहतो. हा इतिहास शिकवत असताना, 'पन्नास लाख ज्यू मारले गेले' असे सांगितले तर मुलांच्या चेहऱ्यांवर फारसा फरक दिसत नाही, पण 'अर्धी मुंबई मारली गेली' असे म्हटले की मुले खडबडून जागी होतात. त्यांना ते भयानक वाटते.

नरसंहाराचा हा इतिहास आठवावा का? ह्या जखमा पुन्हा पुन्हा उखडाव्यात का? असा प्रश्न विचारला जातो. मला वाटतं, या जखमा का उखडायच्या नाहीत? या जखमा कोणी केल्या? हा विचार आपण केला पाहिजे. जखमा करणारे रोगट आहेत. त्यांच्यात विकृती आहे. नाझींच्या निमित्ताने नवाथेंच्या पुस्तकात हे येते की हिंसा किती भयानक असते. ही हिंसा साठ-सत्तर वर्षांपूर्वीची असो, पण म्हणून त्यातील भयानकता जाणवणार नाही असे नाही. म्हणूनच आपण गुजरातच्या दंगलीचा किंवा मुंबईतील बॉम्बस्फोटांचा विचार करतो तेव्हा त्यांतील भयानकता आपल्याला जाणवते.

मोकाशींचे पुस्तकही मला महत्त्वाचे वाटते. अफगाणिस्तानसारख्या लहान देशाला भयानक प्रसंगातून जावं लागतंय, पण त्याबद्दल आपल्याला फारसं काही वाटत नाही. त्याबाबतच्या बातम्याही फारशा येत नाहीत. वृत्तपत्रांनी किंवा न्यूजचॅनेलनी अशा घटनांची दखल का घेऊ नये?

सुरुंग (माईन्स) फुटण्याच्या घटना श्रीलंकेत होतात. काही माणसे, या घटना

## ‘नाझी नरसंहार’

अरुण मोकाशी यांनी अफगाणिस्तानातील युद्धपर्व आणि त्याचे भयानक परिणाम यांवर आधारलेल्या काही स्लाईड दाखवल्या व त्यांचे वर्णन केले.

अरुण मोकाशी म्हणाले, की अफगाणिस्तानातील युद्धाची चार पर्वे सांगता येतील. १. इसवी सन १९७८ ते १९९२; २. इसवी सन १९९२ ते १९९६; ३. इसवी सन १९९६ ते २००१; ४. इसवी सन २००१ ते आतापर्यंत.

रशियन आक्रमणाने १९७८ ते १९९२ या काळात युद्धाला सुरुवात झाली. अफगाणिस्तानात आपापसात भांडणे चालू होती. अमेरिका व रशिया यांना मध्य आशियात आपला दरारा निर्माण करायचा होता, म्हणून रशिया तेथे येऊन कडमडला. अफगाणिस्तानात आल्यावर रशियाच्या लक्षात आले, की त्यांना खेड्यापाड्यातून जास्त विरोध होतो. म्हणून त्यांनी खेड्यांतील लोकांचा संहार करण्यासाठी बॉम्बहल्ले केले. त्याला कार्पेट बॉम्बिंग म्हणतात. अशा हल्ल्यात या ‘गालिचा’मध्ये येणारे व त्याच्या आसपासचे लोक मरत. बॉम्बचा दुसरा एक प्रकार ते वापरत त्याला ‘बटरफ्लाय बॉम्ब’ म्हणतात. त्या बॉम्बमुळे आकाशातून जमिनीत सुरूंग पेरत. त्या सुरुंगांमुळे मोठ्या प्रमाणात विनाश होतो. सुरुंगाला चुकून धक्का लागला किंवा त्याच्यावर पाय पडला तर स्फोट घडून येऊन हत्या होई किंवा अपंगत्व येई. लोक लुळेपांगळे होत.

जगातील इतर देशांनी हे पाहिले व हा संहार थांबवावा असे त्यांना तीव्रतेने वाटले, म्हणून १९८८ मध्ये जिनिव्हा येथे जागतिक परिषद झाली. तेथे रशियाने सैन्य मागे घ्यावे असे ठरले. रशियन सैन्य १९८९ मध्ये मॉस्कोला परत गेले, पण नंतरची तीन-चार वर्षे रशियनांचा प्रभाव अफगाणवर राहिला.

युद्धाचा दुसरा टप्पा १९९२ साली सुरू झाला. रशियन सैन्य गेल्यानंतर राजकीय गटांचे राजकारण सुरू झाले. अहमदशहा मसूद, या नेत्याने काही गटांना एकत्र आणून ‘नॉर्दर्न अलायन्स’ ही युती स्थापन केली. त्याला अफगाणिस्तानला खरोखरच स्वातंत्र्य मिळवून द्यायचे होते. त्याचा उद्देश प्रामाणिक व स्वच्छ होता. त्या युतीने काबूलवर १९९३




साली हल्ला केला. त्यात अनेक लोक मारले गेले. नागरिक घर सोडून मिळेल त्या वाहनाने बाहेर पडू लागले. त्यावेळी बासष्ट लाख लोकांनी देश सोडला. ते पाकिस्तान व इराण या शेजारी देशांत गेले. त्या चार वर्षांत शहराचा ऐंशी टक्के विध्वंस केला गेला.

युद्धाचा तिसरा टप्पा १९९६ पासून सुरू होतो. हा तालिबानांचा काळ होता. तालिबान या शब्दाचा अर्थ ‘विद्यार्थी’ असा आहे. त्यांना पाकिस्तानात असताना तेथील मदरशांमध्ये विशिष्ट प्रकारची शिकवण मिळाली होती. ते अफगाणिस्तानात परत आल्यावर, त्यांनी आपल्या कुटुंबाची झालेली धूळधाण, दुर्दशा पाहिली. त्यांनी ठरवले की ‘आम्ही स्वातंत्र्य मिळवणार!’ त्यांच्यापैकीच एक ओमर होता. तो चांगला माणूस होता, पण परिस्थितीमुळे तो बदलला. तो ओसामा बिन लादेनचा चांगला मित्र होता.

प्रथम तालिबान्यांनी काबूल काबीज केले. अफगाणिस्तानमधील एका गावात एक खाण आहे. त्यात जे अश्म मिळतात ते मौल्यवान आहेत. राण्या ते अलंकारांसाठी वापरत. तालिबान्यांनी त्या खाणीवर कब्जा मिळवला. त्यांनी अनेक वधस्तंभ उभारले. विरोध करणाऱ्या पुरुषाला सर्वांसमोर फाशी द्यायचे व स्त्रियांना गोळ्या घालायच्या अशा मार्गांनी तालिबान्यांनी अफगाणिस्तानात दहशत उत्पन्न केली.

युद्धाचा चौथा टप्पा ‘२००१ ते आता-पर्यंत’ हा आहे. अद्यापही शीतयुद्ध चालू आहे. अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाल्यावर अमेरिकेने इशारा दिला, की ‘ओसामा-बिन-लादिनला आमच्या हवाली करा अन्यथा आम्ही तुमच्या देशावर हल्ला करू.’ एका माणसाकरता एका देशावर हल्ला करणे हे योग्य वाटत नाही. पण अमेरिकेने ४ ऑक्टोबर २००१ या दिवशी अफगाणिस्तानवर हल्ला केला. त्या बॉम्बहल्ल्यात कित्येक पुरुष, स्त्रिया व मुले ठार झाली. ओसामा बिन लादिन अद्यापही हाती लागलेला नाहीच. युद्ध मात्र अद्याप चालूच आहे!

अफगाणिस्तानात १९७८ पासून २००२ पर्यंत शिरणगती झाली नव्हती. अमेरिकेची सत्ता आल्यावर २००२ साली शिरगणती झाली व अफगाणच्या पुन-र्बांधणीच्या योजना २००३ मध्ये आखल्या गेल्या.

अफगाण लोकांना हिंदुस्थानबद्दल आदर आहे. आपली राज्यघटना, आपले आचारविचार याबद्दल त्यांना आपुलकी आहे. ‘सास भी कभी बहु थी’ ही मालिका त्यावेळी चालू होती. तेथे ती फार लोकप्रिय होती. आमच्या गेस्ट हाऊसचा आचारी अब्दुल हा होता. त्याला स्मृती इराणीला भेटायचे होते व त्यासाठी त्याला भारतात यायचे होते! वास्तविक त्याने अफगाणिस्तानात बरेच काही भोगले होते. त्याचे वडील युद्धात मारले गेले. त्याच्या भाभीवर अत्याचार झाले होते. युद्धाच्या नरकात राहणारा हा माणूस पण आपल्या बॉलिवूडचा लामणदिवा त्याच्या मनात तेवत होता.

मुद्दाम करायला लावतात. हे का नाही दाखवले जात?

आपल्याकडे लोकांना 'युद्ध' या विषयाची आवड आहे. 'एखादे धोरण ठरवणे' न म्हणता 'स्ट्रॅटेजी म्हणजे रणनीती' ठरवणे असे म्हणतात. आपले सगळे देव युद्धमान आहेत. सगळ्यांच्या हातात शस्त्रे आहेत. विठोबासारखे शांत देव थोडे आहेत. यातून कोणती संस्कृती आपण जोपासतो हे पुन्हा एकदा ठरवले पाहिजे.

पुस्तकात शिंडलरची गोष्ट आहे. जो एकेकाळी हिटलरचा चाहता, अनुयायी होता तोच नंतर जीवाची बाजी लावून ज्यू लोकांना वाचवतो. भयानकतेतसुद्धा माणुसकी जागी होते हे या कथेतून दिसते.

## अफगाण युद्ध १९७८ ते २००८

## 'ताबडं रक्त : नवा हल्ला'

**कुमार नवाथे –** हिटलर आणि नाझी हा न वाचण्यासारखा पण शिकण्यासारखा विषय आहे. नाझींचा उन्माद साठ वर्षे होता. इसवी सन १९३३ साली हिटलर सत्तेवर आला. पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला. जर्मन लोकांवर प्रचंड निर्बंध घातले गेले. माणसे भुकेकंगाल झाली. संपूर्ण समाज अशांत होता. या हिटलरने अशांततेचे भांडवल केले. त्याने स्वत:चा पक्ष काढला. त्याला वाणीचे वरदान होते. त्याने असंतुष्ट लोकांना आपल्या भाषणांनी असे भारावून टाकले की सर्व जर्मनांनी आपली बुद्धी, आपले स्वातंत्र्य हिटलरकडे गहाण टाकले! त्यामुळे तो इसवी सन १९३३ साली जर्मनीचा चॅन्सलर झाला.

हिटलरसमोर मुख्यत: तीन ध्येये होती– १. व्हर्सायचा तह उध्वस्त करणे; २. कम्युनिझमचा नि:पात; ३. ज्यूंचा सर्वनाश.

हिटलर स्वत: जर्मन होता. तो आर्य वंशाचा होता. बाकीच्यांना जर्मनीमध्ये राहण्याचा अधिकार नाही असे त्याला वाटत होते. म्हणून 'ज्यूं'ना जर्मनीबाहेर काढायचे ठरवले. त्याच्या कार्यकर्त्यांनी बर्लिनमध्ये पुस्तकांची फार मोठी होळी केली. बारा हजार पुस्तके, एकवीस हजार दुर्मीळ छायाचित्रे जाळली गेली. ''जी माणसे पुस्तके जाळतात ती माणसांना जाळायलाही कमी करणार नाहीत.'' हे शंभर वर्षांपूर्वीचे एका ज्यू माणसाचे उद्गार भविष्यात सत्य ठरले. इतकी अंदाधुंदी माजल्यावरसुद्धा कोणीही हिटलरला विरोध करण्यास पुढे आला नाही. उलट, भांडवलदारांनी त्याला मदत केली. हिटलरच्या बारा वर्षांच्या कारकिर्दीतील शेवटची सहा वर्षे (१९३९ ते १९४५) फक्त नरसंहाराची होती.




हिटलर हा कर्तबगार होता. त्याने कधीही दारूला स्पर्श केला नाही. पैशांचा भ्रष्टाचार केला नाही. तो शिस्तबद्ध होता पण धार्मिक उन्मादामुळे तो जगाच्या नकाशात काळा ठरला.

मी स्वत: पोलंडला गेलो होतो. आउशवित्झचे नाझी छळछावणीचे स्थान पाहिले. इतक्या वाईट पद्धतीने ज्यू लोकांना तेथे मारले गेले, की कोणत्याही सहृदय माणसाच्या डोळ्यांत पाणी येईल. वास्तविक, ज्यू लोक बुद्धिमान होते, श्रीमंत होते. सर्वात जास्त नोबेल पारितोषिके ज्यू लोकांना मिळाली आहेत. व्यवसायात, कलाप्रांतात ते निपुण होते पण हिटलरच्या धार्मिक उन्मादामुळे सहा वर्षांत साठ लाख ज्यूंना काळाच्या पडद्याआड जावे लागले, मृत्यू पत्कारावा लागला. त्यांना अत्यंत क्रूर पद्धतीने मारण्यात आले. प्रचंड चरांतून लाखो लोक गाडले गेले. तेथील गॅसचेंबर्सची वर्णने ऐकून अंग थरारते. दहा बाय दहाच्या खोलीत शंभर–दोनशे ज्यूंना काही दिवस ठेवले जाई. नंतर एक दिवस त्यांना गॅसचेंबरमध्ये ढकलून वरील बाजूने ॲसिड सोडले जाई. त्यात तीन मिनिटांत आठशे माणसे मरत. सगळेच भयंकर, अंगावर शहारे आणणारे आहे.

या इतिहासातून आम्ही काही शिकलो नाही. म्हणूनच १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली. पूर्व युगोस्लाव्हियात दोन लाख मुस्लिम मारले गेले. रवांडामध्ये शंभर दिवसांत आठ लाख लोकांना मारले गेले. कुऱ्हाडी, कोयते, वरवंटे अशा कोणत्याही शस्त्रांनी मारले. सुदानमध्ये तेच झाले.

ह्या धार्मिक उन्मादाचा शेवट कुठेतरी व्हावा असे मला वाटते, नाहीतर काही काळानंतर आपल्याकडेही हीच स्थिती होऊ शकते. भारतात ह्या गोष्टी थोड्या कमी आहेत, कारण आपण विचारशक्ती कोणाला गहाण टाकलेली नाही. जात असावी पण ती चार भिंतींत असावी.

महायुद्धाचा विषय जुना आहे, पण धर्माचा–जातीचा उन्माद द्वेषाकडे नेणारा आहे. द्वेष हा विनाशाला कारणीभूत होतो. असा विनाश जगात पुन्हा होऊ नये. पुन्हा कुठेही छळछावणी असू नये असे मला वाटते.

सुजाणांनी, संवेदनशील लोकांनी या विनाशकारी उन्मादाला विरोध करावा अशी माझी इच्छा आहे.

अफगाणिस्तान हा दुर्दैवी देश आहे. खैबरखिंडीतून आलेला प्रत्येक सत्ताधीश अफगाणला तुडवत आला आहे. अफगाणांना मोगल, ब्रिटिश यांच्याशीही युद्ध करावे लागले. आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर त्यांचा विनाश वाढत गेला. या देशाची भू-राजकीय स्थितीच अशी आहे की त्यांच्यावर युद्ध लादले जाते. त्यांना कोणताही आक्रमक सहन होत नसावा म्हणून ते लढत राहिले.

यांतील भयानक प्रकरण म्हणजे तालिबान. तालिबानी वृत्ती सर्वांना माहीत झाली आहे. त्यांनी स्त्रियांना कोंडून टाकले हे त्यांचे सर्वात वाईट कृत्य आहे.

नाझीवादी व तालिबानी या मानवघातकी विचारप्रणाली आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात माणसे त्यांच्याकडे का आकर्षली जातात?

आमच्याकडे मुंबई विद्यापीठात पूर्व जर्मनीचे विद्यार्थी येतात. त्यांना हिटलरबद्दल किंवा मार्क्सबद्दल बोलण्यात रस नसतो. शिक्षणव्यवस्था मॅनेज करताना, त्यांना माहिती देऊन ती रिजेक्ट करावी की माहिती न देता त्यांना अंधारात ठेवून प्रोटेक्ट करावे? स्वतंत्र झालेल्या जर्मनीतसुद्धा त्यांचे नाव काढायचे नसते. तेथील प्राध्यापकही त्याबद्दल फारसे बोलत नाहीत.

खोट्या धर्माचा आधार घेऊन ही मंडळी ठरवणार की कोणी काय करावे व करू नये, स्त्रियांनी काय घालावे वा घालू नये. ह्या सर्व गोष्टी धर्माच्या नावाने ठरवल्या जातात. त्याला तालिबानी वृत्ती म्हणावी असे मला वाटते.

नाझींनी सर्व प्रकारे माणसांचे आयुष्य नियंत्रित केले. सर्वंकष विचारप्रणाली ही नाझी व तालिबानी यांच्यातील समान गोष्ट होती. कम्युनिझम हीसुद्धा सर्वंकष विचार-प्रणाली आहे, पण सर्व माणसे समान आहेत हे कम्युनिझमचे तत्त्व आहे. त्याउलट नाझींचा विषमतेवर विश्वास होता. समतेला विरोध, लोकशाहीला विरोध, स्वातंत्र्याला विरोध, हिंसेचे व युद्धाचे गौरवीकरण, सार्वत्रिक हिंसेचा पुरस्कार, सामाजिक डार्विनवादाचे समर्थन असे विचार म्हणजे हा नाझीवाद. अशा मोलोटोव्ह-कॉकटेलसारख्या विचारांचा भडका उडणारच.

याखेरीज महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्रियांचा वस्तू म्हणून वापर करणे, मुलांना जन्माला घालण्याचे साधन मानणे... ही वृत्ती नाझी व तालिबान यांच्यात समान दिसते. या सर्व प्रणालींमध्ये प्रतिपक्षावर सूड घ्यायचा म्हणजे त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार करणे हे सूत्र दिसते. असे तपशील या दोन्ही पुस्तकांत येतात. स्त्रीला धर्माचे दार मानायचे आणि धर्माच्या नावाखाली तिच्यावर बंधने लादायची व अत्याचार करायचे, तिला नियंत्रित करायचे. मोकाशी व नवाथे या दोघांनी हा विचार चांगल्या प्रकारे मांडला आहे.

फॅसिझम हा शब्दप्रयोग केला जात असला तरी इटालियन फॅसिझममध्ये मुसोलिनीने अशा नरसंहाराचा पुरस्कार उघडपणे केला नाही. काही लोकांना हिटलरमध्ये गुण दिसतात! हिटलर 'चांगला' कसा असेल? साठ लाख लोकांना थंड डोक्यानं मारणारा हा चांगला कसा? माणसाचा चांगुलपणा त्याच्या कृत्यावरून ठरवावा असं मला वाटतं. विषमता हे मूल्य मानून मांडणी करणाऱ्या या प्रणाली मानवतेचा बळी घेणाऱ्या ठरतात. मुक्त विचाराची, स्वातंत्र्याची जिथे भीती असते तेथेच हिंसा होते. जेथे विचारस्वातंत्र्य असते तेथे चर्चा घडून येते. खोटी धार्मिकता जेव्हा संस्कृतीचा ठेका हातात घेते तेव्हा हा धोका निर्माण होतो.

हे सगळे मुद्दे या पुस्तकात आले आहेत. राज्यशास्त्र शिकवताना आम्ही हे तत्त्व म्हणून सांगतो पण त्याचा आविष्कार या पुस्तकांत दिसतो.

भांडवलशाहीत परस्परविरोधी दोन मूल्ये असतात. एक लोकशाही स्वातंत्र्य व दुसरे साम्राज्यवाद. साम्राज्यवादाने छोट्या व्यवस्थांचे बळी दिले. वसाहती व साम्राज्यवाद यातून संकुचितवाद तयार झाला. हिटलर युद्ध जिंकला असता तर काय झाले असते? हा विचार आपण केला पाहिजे. एक हिटलर पराभूत झाला पण अनेक हिटलर ठिकठिकाणी निर्माण झाले आहेत. त्यांचा सामना आपल्याला करावा लागणार आहे. अशा राष्ट्रवादाचा उदय आणि त्याच्याशी संबंधित धर्माधिष्ठित उन्माद यांचा विरोध करावा लागणार आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहता, रशिया व अमेरिका यांनी अनेक छोट्या देशांच्या व्यवस्थांचे बळी दिले. अफगाणिस्तान हे एक उदाहरण झाले. असे अनेक देश आहेत. त्याला विरोध म्हणून जेव्हा हे लोक संघटित होतात त्याला अनेकदा धर्म किंवा जात हा आधार असतो असे वाटते. ते देश चांगल्या पद्धतीने लोकशाही रुजवत नाहीत कारण अमेरिकेसारखा देश एकीकडे लोकशाहीचा जप करत असला तरी दुसरीकडे हुकूमशाही शासनव्यवस्थांनाच बळ देतो. अमेरिकेचे पाठबळ लोकशाही देशास जाताना क्वचितच दिसते. दीर्घकाळ युद्ध करून अमेरिकेने व्हिएतनामचे काय केले? लोकशाही स्थापनेसाठी अमेरिकेने केलेला हस्तक्षेप- इराक; मानवतावादी हस्तक्षेप - बॉस्निया, सोमालिया; समाजवादी व्यवस्थेसाठी रशियाचा हस्तक्षेप - अफगाणिस्तान आणि पुन्हा तालिबानींना विरोध म्हणून अमेरिकन हस्तक्षेप-अफगाणिस्तान. आंतरराष्ट्रीय पातळीवर या महासत्तांचे लोकशाही, मानवी हक्क आणि स्वातंत्र्य यांबद्दलचे प्रेम किती बेगडी आहे हे लक्षात येते.

'ज्यूं'च्या छळणुकीचे, हत्याकांडाचे वर्णन ऐकून आपण विदीर्ण होतो, पण हेच ज्यू जेव्हा आपले राष्ट्र, इस्रायल निर्माण करतात तेव्हा पॅलेस्टिनींचे स्वातंत्र्य हिरावून घेतात. तेथे सर्रास मानवी हक्कांचे उल्लंघन



**मोकाशी, नवाथे, केतकर आणि पेंडसे**

चालू आहे. त्याबद्दल अमेरिका काही बोलत नाही. हा विरोधाभास आपण लक्षात घेतला पाहिजे.

या दोन पुस्तकांच्या निमित्ताने असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात हेच या पुस्तकांचे यश आहे.

**कुमार केतकर** – दोन पुस्तकांत दोन देशांतील हिंसाचाराचे वर्णन आहे. अफगाणिस्तानातील अमानुष व्यवहार अजूनही चालू आहे. नाझी नरसंहार साठ-सत्तर वर्षांपूर्वीचा आहे. अफगाणिस्तान व जर्मनी या दोन देशांमुळे जगात बदल घडले. ही फ्रायटनिंग टेल आहे. ती कशी जन्माला आली? जन्माला येताना व्यक्ती दहशतवादी नसते. ते लहान मूल असते. ते लहान मूल, जीवनाच्या कोणत्या टप्प्यावर दहशतवादाला, मानवी हिंसाचाराला प्रवृत्त होते? गोडसे जन्माला येत नाही, गोडसे होतो. हिटलर जन्माला येत नाही, तो होतो. तालिबान जन्माला येत नाही, तो निर्माण होतो. तो एका विशिष्ट सोशिओपोलिटिकल कॅनव्हासवर निर्माण होतो.

असा जर्मनी पुन्हा निर्माण होईल का, कधीतरी अफगाणचे युद्ध संपेल मग पुन्हा तालिबान तसेच वागतील का? की हे सगळे त्या त्या काळातील घटनाक्रम आहेत? मूलतत्त्ववाद हा शब्द आपण कधी वापरू लागलो? आधी आपण गुन्हेगार, माथेफिरू हे शब्द वापरत होतो, त्याजागी अतिरेकी म्हणू लागलो. टेररिझम हा शब्द कधी आला? मूलतत्त्ववादाच्या पाठोपाठ दहशतवाद हा शब्द आला. ह्या दोन शब्दांनी आपल्या मनात घर केले. सुशिक्षित माणसे सहजपणे म्हणतात, ''ऑल मुस्लिम्स मे नॉट बी टेररिस्ट बट ऑल टेररिस्ट्स आर मुस्लिम्स'' आणि मग हळुहळू निष्कर्ष काढतात, की ''ऑल मुस्लिम्स आर फ्युचर टेररिस्ट्स इफ नॉट टुडे'' त्या तर्काला एक प्रतिष्ठा प्राप्त होते आणि मग आपण हे विसरतो, की 'ऑल टेररिस्ट्स आर नॉट मुस्लिम्स' दहशतवादी संघटनांमध्ये मुस्लिम संघटना आहेत पण त्यापेक्षा ख्रिश्चन संघटना जास्त आहेत. राजीव गांधींची हत्या करणाऱ्या प्रभाकरनच्या संघटनेकडून रोज दोन-तीन माणसांची हत्या केली जाते तर कधी कधी एकदम शंभर-दोनशे माणसे मरतात. एवढ्याशा श्रीलंकेतील उत्तर भाग तामीळ टेररिस्टांनी व्यापलेला आहे व त्यांनी श्रीलंका सरकारला आव्हान दिले आहे! त्यांना आपण हिंदू टेररिस्ट म्हणत नाही. ते हिंदू आहेत व सिंहली बौद्ध आहेत, पण म्हणून श्रीलंकेत जो संहार चाललेला आहे तो हिंदू व बौद्ध यांच्यातील आहे असे आपण म्हणत नाही किंवा नॉर्थ व साऊथ आयर्लंडमधील संहाराला आपण प्रॉटेस्टंट मूलतत्त्ववाद व कॅथलिक मूलतत्त्ववादातील संहार, असेही म्हणत नाही.

इस्रायलमध्ये पंतप्रधान रॉबिनचा खून एका ज्यू माणसाने केला, कारण त्याला पॅलेस्टाइनबरोबरील वाटाघाटी मान्य नव्हत्या. स्पेनमध्ये जे बॉम्बहल्ले होतात तेही मुस्लिम करत नाहीत.

जगात निरनिराळ्या प्रकारचे दहशतवादी आहेत व त्यांना फंडिंग करणारे, त्यांना आश्रय देणारेही आहेत. इराकमध्ये युद्ध सुरू झाल्यावर अमेरिकन सैनिक किती मारले गेले ती माहिती मिळते, पण इराकी किती मारले गेले ती माहिती मिळत नाही. दीड ते अडीच लाख इराकी लोक पहिल्याच बॉम्बहल्ल्यात मेले. विमानांचा आवाज खाली येणार नाही, रात्री कोणताही लाईट दिसणार नाही अशी विमाने बॉम्बिंग करून गावे उडवून लावत. त्यामुळे काही लोक बॉम्बहल्ल्यांत मरतील, बाकीचे पाणी नाही म्हणून मरतील अशी योजना होती. अफगाणिस्तानात तुरुंगांवर बॉम्बहल्ले झाले. खरेतर, हे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन करणारे आहे, पण आपण त्याला अमेरिकन दहशतवाद म्हणत नाही. बुशला टेररिस्ट म्हणत नाही पण ओसामा बिन लादिनला मात्र अतिरेकी म्हणतो.

किती लोक मारले गेले की नरसंहार म्हणावा? आपण एक लाख हा आकडा ठरवू. इराकमध्ये तेवढा नरसंहार झाला पण आपण जॉर्ज बुशला टेररिस्ट म्हणत नाही. अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला तो अतिरेकी हल्ला होता, पण अमेरिकेने व्हिएतनामवर बॉम्बिंग करून तीस लाख

माणसे मारली. त्यासाठी बी फिफ्टी, यू बॉम्बर्स वापरले. त्याची एकेकाची किंमत त्या काळात शंभर कोटी रुपये होती. व्हिएतनामकडे टँक्स नव्हते, प्लेन्स नव्हती, बॉम्ब नव्हते, ॲडव्हान्स मशिनगन्स नव्हत्या. व्हिएतनामी सैनिक अमेरिकन सैनिकांना मारून त्यांच्या मशिनगन्स, टँक्स पळवायचे व त्यांचाच उपयोग करून अमेरिकन सैनिकांवर हल्ला करायचे, पण आम्ही अमेरिकनांना टेररिस्ट म्हणत नाही.

एका बॉम्बहल्ल्यात सगळे नातेवाईक मेले. वय वर्षे सहा ते सोळा वयोगटातील दहा-बारा मुले मात्र जिवंत आहेत. त्यांना काय घडत आहे, बॉम्बहल्ला म्हणजे काय हे काहीच कळत नाही. त्यांना त्याची कल्पनाच नाही. पण ही मुले जेव्हा मोठी होतील तेव्हा त्यांना कळेल, की अमेरिका नावाच्या देशाने आपल्या देशावर बॉम्बिंग केले, पण आता सूड कोणावर उगवायचा? आपण काय करावे? आपण टेररिस्ट सेंटरवर जाऊ असा विचार करून जर ती मुले टेररिस्ट झाली व त्यांनी अमेरिकेवर हल्ला केला तर अमेरिका म्हणेल, ''बघा, हे इराक व अफगाणिस्तानातील टेररिस्ट आहेत. तेथे टेररिझम वाढत आहे. ऑल टेररिस्ट्स आर मुस्लिम्स.''

अमेरिकेने केला तो दहशतवाद नव्हता पण त्याची प्रतिक्रिया म्हणून जे घडले तो मात्र दहशतवाद! हा दहशतवाद जो मूलतत्त्ववादातून निर्माण झाला ती संकल्पना इ.स. १९७९ पूर्वी नव्हती. तो शब्दप्रयोगही नव्हता. त्यानंतर काही वर्षांतच दहशतवाद हा चर्चेचा विषय झाला. युनायटेड नेशन्सकडे दहशतवादाची व्याख्याच नाही. तशी व्याख्या करायला अमेरिका व इस्रायलचा विरोध आहे.

इराणमधील शहाची स्थिर राजवट इ.स. १९७९ साली खोमेनीने उधळून लावली. इराणमधील लाखो शियापंथी लोकांना खोमेनीने जवळ केले व सांगितले, की 'हा शहा आपल्या धर्मावर अत्याचार करत आहे, पण त्याला कसे काढणार? कारण शहाला अमेरिकेचा पाठिंबा आहे.' त्याने शिया लोकांची संघटना बांधली व काही दिवसांतच शहाची सत्ता जाऊन खोमेनीची राजवट आली. शहा अमेरिकेच्या आश्रयाला गेला. त्या राजवटीला जगातील प्रेसने 'फंडामेंटलिस्ट रूल इन इराण हॅज बिन एस्टॅब्लिश्ड' असे म्हणायला सुरुवात केली आणि तेव्हापासून 'फंडामेंटॅलिझम' हा शब्दप्रयोग सुरू झाला. खोमेनीने शहाला धर्मवाद्यांच्या आधाराने, स्वातंत्र्याची घोषणा करून त्याला हुसकावून लावला. ते पाहून अमेरिकेला धसका बसला. अमेरिकेने इराकचा अध्यक्ष सद्दाम हुसेनला कॉन्टॅक्ट केले व सांगितले, की ''इराणपासून तुम्हाला धोका आहे. तुम्ही इराणशी युद्ध करा. आम्ही तुम्हाला मदत करू.'' हे युद्ध १९७९ ते १९८९ पर्यंत चालू होते. त्याचवेळी रशियाने अफगाणिस्तानात प्रवेश केला. त्यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष कार्टर हे मवाळ धोरणाचे होते. इ.स. १९८० साली निवडणुका झाल्या. त्यात कार्टर हरले व रेगन निवडून आले. त्याचवर्षी ब्रिटनमध्ये मार्गारेट थॅचर निवडून आल्या. त्या दोघांना जगाची पुनर्मांडणी करायची होती.

जर अमेरिका इराणवर हल्ला करत असेल तर तेथे आपलीही उपस्थिती हवी अशा विचाराने सोव्हिएत सेना अफगाणिस्तानात आली. अमेरिकेने ज्या धर्मवादाला विरोध करण्यासाठी खोमेनींच्या विरुद्ध युद्ध सुरू केले त्याच तशाच प्रकारच्या धर्मवाद्यांना हाताशी धरून अमेरिकेने मुजाहिद्दीन मुस्लिमांना 'यू टेक द स्लोगन ऑफ इस्लाम. प्रोटेक्ट इस्लाम' अशी घोषणा दिली. म्हणजे मूलतत्त्ववाद अमेरिकेने आणला. इस्लामिक फंडामेंटॅलिझमचा निर्माता अमेरिका आहे. अफगाणिस्तान कधीही कोणाची वसाहत झाला नाही. अनेकांनी प्रयत्न केले पण कोणालाच यश आले नाही.

अफगाण कशासाठी हवा? तर अफगाण ताब्यात असेल तर संपूर्ण दक्षिण आशिया ताब्यात येऊ शकतो. म्हणून अमेरिकेने अफगाणमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेला प्रतिकार करण्यासाठी, रोखण्यासाठी सोव्हिएत युनियन घुसले. हे सगळे १९७९ मध्येच घडले. गोर्बाचेव्ह १९८९ साली रशियात राज्यावर आले. दहा वर्षांत खूप रशियन सैन्य मारले गेले होते. हे युद्ध आपल्याला परवडणारे नाही अशा विचाराने त्यांनी अफगाणमधून सैन्य मागे घेतले. त्यावेळी 'अफगाणींचा डार्लिंग ऑफ फ्रिडम' असे ज्याला अमेरिकेने म्हटले तो हिरो म्हणजे ओसामा बिन लादिन होता. अमेरिकेने त्याला पैसा व शस्त्रास्त्रे पुरवली. व्हाईट हाऊसवर त्याचा सत्कार झाला, म्हणजेच मूलतत्त्ववाद व दहशतवाद यांचे तेच निर्माते आहेत.

हे सगळे वाचल्यावर आपण एवढेच म्हणू शकतो की धिस थ्रेड इज नॉट व्हॅनिश्ड. आपली डोकी कशी भडकू शकतात ते स्वत:च पाहावे. गुजरातमधील दंगली टिव्हीवर पाहाताना आपण मानवतावादी विचार करत होतो का हे प्रत्येकाने स्वत:च स्वत:ला विचारावे.


**नाझी नरसंहार**
**कुमार नवाथे**
आणि
**तांबडं रक्त : नवा हल्ला**
**अरुण मोकाशी**
ही दोन पुस्तके केवळ ३५० रुपयांत घरपोच मिळू शकतील.
संपर्क : ग्रंथाली, म्युनिसिपल स्कूल इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
फोन : २३८९ २४४५/ २३८७५४८१

गेल्या तीस वर्षांचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येईल, की अफगाण लोक वाईट नाहीत. परिस्थितीने त्यांनी स्त्रियांवर बंधने आणली. तालिबान वॉज बॉर्न वुईथ द हेल्प ऑफ आयएसआय ॲण्ड अमेरिका.

'हिटलर जिंकला असता तर!' अशी कल्पना करून रिचर्ड हॅरिस या लेखकाने 'फादरलँड' ही कादंबरी लिहिली आहे. त्याची सुरुवात 'बर्लिन, हिटलर हॅज वन द वॉर' अशी केली आहे. हिटलरच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाला अमेरिकेच्या प्रेसिडेंटला बोलावावे, जर्मनी कसा पॉवरफुल आहे ते जगाला दाखवून द्यावे असे ठरवतात. त्याबरोबर कादंबरीत फ्लॅशबॅक पद्धतीने काही वर्णन केले आहे. साठ लाख ज्यूंना मारण्यासाठी काय काय तयारी करावी लागेल, तेवढ्या बॉडी कशा प्रकारे डिस्पोज कराव्या, किती ट्रक, किती रेल्वे वाघिणी लागतील असा संपूर्ण प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यात आला असे वर्णन आहे. कॉर्पोरेट स्टाइलचा प्रोजेक्ट रिपोर्ट बनवण्याची प्रक्रिया हिटलरने सुरू केली.

कॉर्पोरायटेशन ऑफ पॉलिटिक्स ऑफ फंडामेंटलायझेशन, कॉर्पोरायटेशन ऑफ इकॉनॉमिक्स अँड कॉर्पोरायटेशन ऑफ स्पोर्ट्स इज द बिगिनिंग ऑफ द फंडामेंटलायझेशन, टेररिझम अँड फॅसिझम.

**नरेंद्र जाधव** – ही दोन पुस्तके ज्वलंत विषयावर, पोटतिडिकीने व संवेदनशीलतेने लिहिली आहेत. प्रा. अरुणा पेंडसे यांनी तालिबानी वृत्तीची केलेली व्याख्या मला आवडली. कुमार केतकरांनी वेगवेगळ्या युद्धाचा जो अन्वयार्थ सांगितला तो अप्रतिम आहे. उन्माद म्हणा, द्वेष म्हणा या सगळ्यांच्या मागे सत्तेचे राजकारण असते.

दहशतवादाबद्दल बोलताना आपण नेहमी वेगवेगळ्या प्रकारे बोलतो. दहशतवादाला एखाद्या देशाने खतपाणी घालणे हे अत्यंत घातक आहे. दहशतवाद हा अंतर्गतही असतो. समाजातील एका गटाने दुसऱ्या गटाचा नि:पात करणे, खच्चीकरण करणे हाही दहशतवादच होय. भारतीयांचा गोड गैरसमज आहे की आपण फार सहिष्णू आहोत. पण जातीयवादाच्या रूपाने आपण तीन हजार वर्षे दहशतवादाची प्रॅक्टिस करत आलो आहोत. एका छोट्या समूहाने लाखो लोकांवर हा दहशतवाद लादला आहे. मी स्वत: त्या दहशतवादाचा अनुभव घेतला आहे.

इथिओपियामध्ये सगळ्या लोकांवर चौदा वर्षे एक प्रकारचा मॉर्शल लॉ लादलेला होता. मी १९८८ मध्ये पाहिले की सर्व सरकारी कर्मचारी एकाच प्रकारचा गणवेश घालत व ऑफिसमध्ये शिरताना हात वर करून जात. सौदी अरेबियात जो एक स्टेटस्पॉन्सर टेररिझमचा प्रभाव त्यांच्या डोळ्यांत, वागण्यात दिसतो तशीच भीती मी अफगाणिस्तानमध्ये पाहिली.

कुमार केतकरांनी 'आर्यन'चा उल्लेख केला. अफगाणिस्तानमधील लोकांची ठाम समजूत आहे, की जगातील खरे आर्यन लोक हे अफगाणी आहेत! अफगाण एअरलाइन्सचे नाव आहे 'एरियाना'. हा शब्द आर्यन एअरलाइन्स या दोन शब्दांपासून बनला आहे. पाणिनीपासून सगळे श्रेष्ठ लोक ज्या प्रांतात राहिले तो भाग म्हणजे अफगाणिस्तान. तेथे वेदांचा सत्तर टक्के भाग रचला गेला. तो देश एकेकाळी फार सुंदर होता. फॅशन्स पॅरिसहून निघाल्या की तेहरानला व नंतर काबूलला जात तेथून भारतात व पूर्व आशियात येत. आता मात्र तो देश पूर्ण बेचिराख झाला आहे. सर्वच कुटुंबे पोळली गेली आहेत. सर्वांच्या चेहऱ्यावर भीती दिसते. राष्ट्राची उभारणी करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

यू.एस.आय.डी. या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे मी तेथे गेलो होतो. मी संस्थेला सांगितले की माझ्या दाढीमुळे व माझ्या देहयष्टीमुळे मी येथे अफगाणी व्यक्ती म्हणून सहज खपून जाईन. मला सिक्युरिटीची गरज नाही, पण तुम्ही अमेरिकन सिक्युरिटी द्याल तर मला टार्गेट करण्यास ते सोपे होईल. मी सुदैवाने बचावलो.

तेथे मोठ्या रेस्टॉरंटमध्ये बाहेर बोर्ड असतो की 'तुमच्याजवळ असलेली शस्त्रे येथे जमा करावी.' म्हणजे शस्त्रे घेऊन फिरणे हे तेथे इतके कॉमन आहे. तो त्यांच्या आयुष्याचा भाग झाला आहे!

कितीही टेररिझम असला तरी माणसाच्या ज्या जगण्याच्या मूळ प्रवृत्ती असतात त्या कोठेतरी व्यक्त होतात अशी काही माणसे उभी राहतात. ज्यावेळी अमेरिकन सैन्य काबूलमध्ये शिरत होते व तालिबानी पळून जात होते तेव्हा तेथे जी मध्यवर्ती बँक आहे तेथील सोने घेऊन जाण्याची तालिबान्यांची इच्छा होती. तेव्हा त्या बँकेतील कर्मचाऱ्यांनी लॉकरची चावी लॉकरमध्येच मोडली. त्यामुळे तो उघडणे तालिबानींना शक्य झाले नाही. घाईघाईत पळून जाताना

दुसरे उदाहरण म्हणजे तेथील म्युझियममध्ये उत्तमोत्तम चित्रे आहेत. तेथील केअरटेकरने त्या चित्रांवर चिखल लावला. त्यामुळे तालिबानींनी त्या चित्रांकडे पाहिले नाही. म्हणून ती चित्रे म्युझियममध्ये राहिली. नंतर चिखल काढून टाकल्यावर ती पूर्ववत झाली. आता ती चित्रे म्हणजे अफगाणिस्तानचा उत्तम खजिना आहे.

प्रत्येक समाजात सकारात्मक कामे करणारी माणसे असतात. अशा प्रकारच्या जागरूक, सज्जन व संवेदनशील व्यक्तींना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तीच दहशतीचा मुकाबला करू शकतात. ते काम या दोन्ही पुस्तकांतून होणार आहे. या निमित्ताने अनेक प्रश्न पुढे आले व त्यावर चर्चा झाली याबद्दल 'ग्रंथाली'चे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

**(वृत्तांत – शर्मिला पिटकर)**

## फुटपाथवर प्रकाशन

# नव्या ग्रंथचळवळीचा आरंभ

**पद्मा कऱ्हाडे**

डॉ. शैलेंद वैशपायन हे होमिओपॅथीचे डॉक्टर. पार्ले टिळकचे विद्यार्थी. होमिओपॅथीची औषधे देत असताना, त्यांचा अनेक पेशंटशी संपर्क आला. पेशंटच्या विविध प्रकारची माहिती–कथा, व्यथा– ऐकायला मिळाली. ती ऐकून त्यांना एक पुस्तक लिहावे असे वाटू लागले आणि त्यांनी ते लिहिलेही. 'Sattern & I' हे ते पुस्तक. वयाच्या सव्विसाव्या वर्षी लिहिलेले. म्हणजे पाच वर्षांपूर्वी. पुस्तक लिहिणे हे एक वेळ सोपे आहे, पण ते छापणे महाकर्मकठीण!

पुस्तक छापण्यासाठी, डॉ. शैलेंद्रनी भारतातील व भारताबाहेरीलही अनेक प्रकाशकांकडे विचारणा केली. भारता–बाहेरील प्रकाशकांनी प्रकाशनाचा खर्च हजारो डॉलर्समध्ये येईल असे सांगितले. अर्थात तो खर्च डॉ. शैलेंद्र यांनीच करायचा. भारतातील प्रकाशकांनीही खर्चाचे असेच मोठे आकडे सांगितले. फक्त डॉलर्सऐवजी रुपयांमधील. त्याशिवाय प्रकाशन समारंभाला कोणा सेलिब्रेटीला बोलवायला हवे. त्यासाठी त्या व्यक्तीच्या मानधनाचे आकडे ताशी पाच हजार रुपये व त्याच्यापुढील होते. हे कमी म्हणून की काय, असेही सांगितले गेले की प्रकाशन समारंभ 'हॉटेल ओबेरॉय', 'हॉटेल ताज' अशा ठिकाणी व्हायला हवा. तिथे होणारा खर्च हा डॉ. शैलेंद्र यांनीच करायचा! बरे इतके सांगितल्यावर तीच प्रकाशक मंडळी पुढे असेही म्हणाली, की नुकत्याच अशा पद्धतीने प्रकाशन झालेल्या एका पुस्तकाच्या पुढे शंभर–दीडशे प्रतीही विकल्या गेल्या नाहीत. बरं, ही छापलेली पुस्तके निरनिराळ्या कुठल्या दुकानात विक्रीसाठी ठेवायची, ते तुमचे तुम्हीच करा – आम्ही फक्त छपाईचे काम करणार!

हे सर्व किस्से ऐकून डॉ. शैलेंद्र हबकून गेले. नुकतीच करियरची सुरुवात झालेली, केवळ एक हौस म्हणून पुस्तक लिहिले आणि छापायचे ठरवले. एवढे पैसे कुठून आणणार?

डोक्यात विचारचक्र चालू होते. यावर काहीच उपाय नाही का? एखाद्या सामान्य माणसाने जर एखादे चांगले पुस्तक लिहिले तर केवळ पैशांअभावी तो छापूच शकणार नाही का? ओळखीच्या लोकांशी, मित्रमंडळींशी चर्चा करणे चालू होते.

डॉ. शैलेंद्र अंधेरीच्या त्यांच्या क्लिनिकच्या जवळ, रस्त्यावर पुस्तके विकणाऱ्या, एका माणसाकडून नेहमी पुस्तके विकत घेत. त्यामुळे त्यांची त्याच्याशी बऱ्यापैकी ओळख झाली होती. त्याच्याजवळ एकदा, डॉ. शैलेंद्रनी स्वत:च्या लिहिलेल्या पुस्तकाचा विषय काढला तेव्हा तो म्हणाला, द्या साहेब, तुमचे पुस्तक. बघतो मी काय करायचे ते!

त्या विक्रेत्याने, डॉ. शैलेंद्र यांचे पुस्तक दुसऱ्या एका माणसाला वाचायला दिले. ज्याने ते वाचले तो म्हणाला, चांगले आहे. खपेल छापले तर.

रस्त्यावर पुस्तक विकणाऱ्यांचेही काही आडाखे असतात. त्यामुळे डॉ. शैलेंद्रनी असे ठरवले, की आपले पुस्तक आपणच छापायचे आणि हे असेच रस्त्यावर विकायला ठेवायचे. म्हणून 'पेव्हमेंट पब्लिशर्स' हे नाव निश्चित केले. पुस्तकाचे एडिटिंग वगैरे करून घेऊन, २३ डिसेंबर २००७ रोजी अंधेरीत रस्त्यावर, डॉ. शैलेंद्र यांच्या 'Sattern & I' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कोणाच्या हस्ते? तर – रस्त्यावरच झोपून, सकाळी वर्तमानपत्रे टाकून, शिवाय शिकून बी.कॉम. झालेल्या एका मुलाच्या हस्ते!




**मध्ये डॉ. शैलेंद्र वैशंपायन**

''जनसामान्यांना, त्यांच्यातीलच एका सामान्य जनाची ओळख करून देणे'' हा त्यामागील उद्देश होता असे डॉ. शैलेंद्रनी सांगितले.

अशा या अभूतपूर्व प्रकाशन सोहळ्याला उपस्थित असणाऱ्या, रस्त्या–वरील मंडळींना वडापाव व कटिंग चहा देऊन त्यांचे स्वागत केले गेले.

हे सर्व चित्तथरारक वर्णन माझ्या मन:चक्षूंपुढे या क्षणीही दृश्य रूपाने उभे राहिले आहे. तुमचीही अवस्था, माझ्यापेक्षा निराळी झाली असेल, असे वाटत नाही.

शैलेंद्र म्हणाला, की त्याने पाच–सहा

→

महिन्यांत पुस्तकाच्या पाचसहाशे प्रती संपवल्या. मला पार चेन्नईपासून वाचकांचे पुस्तकांबद्दल प्रतिक्रिया देणारे फोन आले. फूटपाथवर पुस्तके खूप कमी किमतीला विकली जातात. त्यामुळे मी गुंतवलेल्या साधारण पन्नास हजारांपैकी पस्तीस हजारां-पर्यंत तरी रुपये परत मिळतील अशी अपेक्षा आहे. परंतु माझे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि वाचकांपर्यंत पोचले हा आनंद मोठा आहे.

शैलेंद्रच्या या धाडसाकडे अनेक लेखकांचे लक्ष वेधले आहे आणि अनेक लोक पुस्तक अशा पद्धतीने प्रकाशित करण्याबद्दल विचारणा करत आहेत. मालती कारवारकर यांचे इंग्रजी पुस्तक याच पद्धतीने प्रसिद्ध करणार आहेत.

मग याच पेव्हमेंट पब्लिशर्सच्या बॅनरखाली लवकरच माझ्या मुलाचे- प्रशांतचे पुस्तक प्रकाशित केले – तेही पुण्यातील एका रस्त्यावर!

ही चळवळ आता पुण्यातही पोचली आहे. तेथील एक नाट्यसंच त्यांचे पुस्तक अप्पा बळवंत चौकात प्रसिद्ध करणार आहे! तशीच ती इतरही सर्व भागात पोचेल. त्यासाठी माझ्या सदिच्छा!

**प्रशांतच्या पुस्तकाविषयी**

आपण एखादे प्रेक्षणीय स्थळ पाहून आलो की आपल्याला वाटते, तिथे पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी, तेथील सौंदर्य, त्यातील बारकावे आपण आता आयुष्यात विसरणार नाही, पण काही काळ लोटल्यावर ते सारे, विस्मृतीच्या पडद्याआड गेल्याचे आपल्याला जाणवते.

'अविनाश देशपांडे'च्या (कादंबरीचा नायक) बाबतीत अगदी असेच घडते. त्याला वाटते, की त्याने अमेरिकेत पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी आयुष्यात कधी विसरणार नाही, पण भारतात परत आल्यावर जेव्हा तो त्याच्या काकाला, हवाई बेटांविषयी सांगू लागतो तेव्हा त्याला जाणवते की अरे! बऱ्याच गोष्टी, त्यांचे तपशील आपण विसरू लागलो आहोत. ते पूर्णपणे विसरण्याआधीच त्या गोष्टी कागदावर का उतरवू नयेत, असे वाटून, अविनाशने, हवाईविषयी लिहायला सुरुवात केली. साऱ्या आयुष्याचा चलत् चित्रपटच त्याच्या डोळ्यांसमोर सरकू लागला.

लहानपणापासून घडलेल्या घटना, त्यांचा त्या बालमनावर झालेला परिणाम, त्या प्रत्येक घटनेपासून त्याने घेतलेला धडा व त्यामुळे त्याचे घडलेले आयुष्य. ह्या सर्व गोष्टींचा पट, अविनाशच्या लिखाणातून आपल्यासमोर उलगडतो. अविनाशने आयआयटीत प्रवेश मिळवण्यासाठी घेतलेले परिश्रम- आयआयटीत मिळवलेला प्रवेश – तेथील चार वर्षांच्या कालावधीत अनुभवलेले ताणतणाव – पुढे अमेरिकेत जाण्याचे पाहिलेले स्वप्न – ते स्वप्न प्रत्यक्षात उतरणे – अमेरिकेतील विद्यार्थिदशेतील अनुभव – नोकरी – तीही अमेरिकेत करतानाचे अनुभव... अमेरिकेचे अंतरंगच अविनाशने आपल्याला उलगडून दाखवले आहे.

टिपिकल मध्यमवर्गीय, महाराष्ट्रीयन घरात जन्मलेल्या, मोठ्या झालेल्या अविनाशच्या आयुष्याचा जीवनपट म्हणजेच प्रशांतने लिहिलेली 'Memory Remains' ही त्याची पहिली कांदबरी.

सुंदर, सोप्या शैलीतील ही कादंबरी! आयआयटीतील जी मुले अमेरिकेतील जीवन अनुभवत आहेत वा अनुभवून भारतात परत आली आहेत, त्यांना ही कादंबरी आवडेल यात शंका नाही आणि ज्यांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जायची इच्छा आहे, अशा तरुण मंडळींना ही कादंबरी मार्गदर्शक ठरेल, हे निश्चित!

प्रशांतच्या पुस्तकाचे प्रकाशन रास्ता पेठेतील रद्दीच्या दुकानासमोर फूटपाथवर झाले. त्यावेळी पन्नास-साठ माणसे जमा झाली. मुंबईहून वैशंपायन, त्यांचे साथीदार आणि फूटपाथवरील पुस्तकविक्रेते हजर होते.

**– पद्मा कऱ्हाडे**
**११ गणेश भुवन, नटवरनगर रोड नं. २**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०**

**सघन आशयाची दमदार पुस्तके**

# विचारवेध

**तीन संग्रह : बेचाळीस संकल्पना**

**डॉ. विजय जोशी/जयश्री जोशी**

**भारतीय संदर्भ : विद्या गारखेडकर**

'स्वातंत्र्य', 'जनता', 'कर्तव्यकर्म' असे अनेक शब्द आपण सहजगत्या वापरतो; परंतु त्या संकल्पनांमागे केवढा राजकीय व तत्त्वज्ञानात्मक विचार व अर्थ दडलेला आहे हे उलगडून दाखवणारे तीन अपूर्व संग्रह.

**तीन पुस्तकांची किंमत छापील ६३० रुपये ● फक्त ४०० रुपयांत घरपोच मिळवा.**

ग्रंथाली, म्युनिसिपल स्कूल इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर मार्ग पोलिस स्टेशनसमोर, ग्रँटरोड, मुंबई-४०० ००७
● फोन : २३८७ ५४ ८१ / २३८९ २४ ४५